दैनिक अहिल्यानगर। पुणे। छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI NO.MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रु. ४.००। अंक २८२। रविवार, दि.२६ जुलै २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Sahyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

## पदाचा दुरुपयोग : सहाय्यक सरकारी वकील अर्जुन पवारांचे पद संपुष्टात

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** येथील जिल्हा न्यायालयात सहाय्यक सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता म्हणून कार्यरत असलेले ॲड. अर्जुन बाळासाहेब पवार यांच्याकडून पदाचा दुरूपयोग झाल्याच्या कारणावरून राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाने त्यांचे पद तत्काळ संपुष्टात आणले आहे. तसे आदेश विधी व न्याय विभागाचे उप विधी सल्लागार-उपसचिव डॉ. कुँवरसिंह राजबहादूरसिंह सिंघेल यांनी काढले आहेत. सहाय्यक सरकारी वकील म्हणून काम करतांना पदाचा दुरूपयोग होत असल्याची तक्रार येथील वकीलामार्फत करण्यात आली होती. त्या तक्रारीची दखल घेऊन थेट राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाने ही कारवाई केली आहे. ॲड. अर्जुन पवार यांना या पदावर काम करतांना मुदतवाढ देखील देण्यात आली होती. मात्र ही नियुक्ती शासन निर्देशानुसार शासन अधिसुचेनुसार तत्काळ प्रभावाने संपुष्टात आणण्यात आले आहे. राज्यापाल यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली आहे.

## झुरळ समजलेल्या पिढीने लोकशाहीचा आरसा दाखवला!

लोकशाहीचे खरे सौंदर्य निवडणुकांमध्ये नसते, तर सत्तेला वेळोवेळी जाब विचारणाऱ्या सजग नागरिकांमध्ये असते. सरकारे बहुमताने सत्तेत येतात; परंतु त्यांना घटनात्मक मर्यादा, नैतिक जबाबदारी आणि जनतेपुढील उत्तरदायित्व यांची सतत आठवण करून देण्याचे काम लोकशाहीतील नागरिक करतात. अलीकडील नीट पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर उभे राहिलेले विद्यार्थ्यांचे आंदोलन आणि त्यानंतर केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा झालेला राजीनामा हा केवळ एका मंत्र्याच्या पदत्यागाचा विषय नाही; तर भारतीय लोकशाहीतील उत्तरदायित्वाचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून त्याकडे पाहावे लागेल.




काही वर्षांपासून देशात अनेक प्रश्नांवर आंदोलने झाली. शेतकरी आंदोलन झाले, बेरोजगारीवर आंदोलने झाली, विविध सामाजिक आणि आर्थिक मुद्द्यांवर लाखो लोक रस्त्यावर उतरले. मात्र, केंद्र सरकारने बहुतांश वेळा ताठर भूमिका घेतली. सरकारच्या राजकीय ताकदीमुळे अनेक आंदोलने कालांतराने क्षीण झाली. त्यामुळे सरकार कोणत्याही आंदोलनापुढे झुकत नाही, अशी एक प्रतिमा तयार झाली होती.

मात्र, या वेळी चित्र वेगळे होते. कारण आंदोलनाचे नेतृत्व पारंपरिक राजकीय पक्षांकडे नव्हते. या आंदोलनाचा केंद्रबिंदू होता देशातील विद्यार्थी. ज्यांना अनेकदा मोबाईलमध्ये गुंतलेली, रील्स पाहणारी, राजकारणापासून दूर गेलेली किंवा अगदी झुरळ म्हणूनही हिणवले गेले, त्या जेन-झी पिढीने आपल्या संघटित शक्तीचा परिचय करून दिला.

(उर्वरीत पान २ वर)

# केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा

## ■ ३५ दिवसांच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनापुढे केंद्र सरकार झुकले!

## ■ विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून राजीनामा दिल्याचा प्रधानांचा दावा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे गेल्या ३५ दिवसांपासून कॉकरोच जनता पार्टी आणि विद्यार्थ्यांकडून सुरू असलेल्या आंदोलनाला अखेर मोठे यश मिळाले असून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी शनिवारी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात एखाद्या आंदोलनानंतर केंद्रीय मंत्र्याला राजीनामा द्यावा लागल्याची ही पहिलीच घटना मानली जात आहे.

नीट-यूजी परीक्षेतील कथित अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलन सुरू होते. आंदोलनकर्त्यांनी कोणतीही तडजोड स्वीकारणार नसल्याचा इशारा दिल्यानंतर दिल्लीतील आंदोलनाचे पडसाद मुंबई, राजस्थान, बिहार, गुवाहाटी आदी राज्यांत उमटले. वाढता जनक्षोभ आणि विद्यार्थ्यांचा असंतोष लक्षात घेऊन अखेर केंद्र सरकारने धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा स्वीकारल्याचे समोर आले.



राजीनाम्यानंतर प्रसिद्ध केलेल्या पत्रात धर्मेंद्र प्रधान यांनी देशातील विद्यार्थ्यांचे हित आणि राष्ट्रीय एकता सर्वोच्च असल्याचे नमूद केले. जंतर-मंतरवर आणि देशात निर्माण झालेल्या परिस्थितीचा राष्ट्रविरोधी शक्तींनी फायदा घेऊ नये, एकाही विद्यार्थ्याचे भविष्य कायदेशीर अडचणीत सापडू नये आणि विद्यार्थ्यांनी आंदोलनाऐवजी शिक्षण व करिअरवर लक्ष केंद्रित करावे, या विचारातून मी पंतप्रधानांकडे माझा राजीनामा सादर केला आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

प्रधान यांनी आपल्या पत्रात गेली चार दशके शिक्षण क्षेत्रासाठी कार्यरत असल्याचा उल्लेख करत शिक्षण व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला. ३ मे २०२६ रोजी झालेल्या नीट-यूजी परीक्षेत अनियमितता उघड झाल्यानंतर केंद्र सरकारने तत्काळ सीबीआय चौकशीचे आदेश दिले, परीक्षा रद्द करून पुनर्परीक्षा घेतली तसेच पुढील वर्षापासून परीक्षा संगणकाधारित (उइढ) पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

२० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी केंद्र, राज्य सरकारे आणि जिल्हा प्रशासनाने समन्वयाने काम केले. गुणवंत विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ नये, हा माझा कायम प्रयत्न राहिला, असेही त्यांनी नमूद केले. मात्र, या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान काही जबाबदार व्यक्तींनी विद्यार्थ्यांची दिशाभूल केल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली.

पत्राच्या शेवटी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मंत्रिमंडळातील सहकारी, मंत्रालयातील अधिकारी-कर्मचारी आणि सर्व सहकाऱ्यांचे आभार मानत राष्ट्रसेवा हीच आपल्या आयुष्याची सर्वोच्च प्राथमिकता राहील, अशी ग्वाही धर्मेंद्र प्रधान यांनी दिली.



**मी पहिल्या दिवसापासून या घटनेची नैतिक जबाबदारी स्वीकारली आहे आणि या परिस्थितीपासून कधीही तोंड लपवले नाही. गेल्या १० दिवसांतील घटनाक्रम पाहून माझे मन अत्यंत दुखी झाले आहे. हा माझ्यासाठी वैयक्तिक प्रतिष्ठेचा विषय नाही. जंतर-मंतरवर आणि देशात निर्माण झालेल्या परिस्थितीचा देशविरोधी शक्तींनी गैरफायदा घेऊ नये आणि देशाची एकता अबाधित राहावी, म्हणूनच मी हा निर्णय घेतला आहे. आदरणीय पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली देशसेवेची संधी मिळाली, याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.**

– **धर्मेंद्र प्रधान,** राजीनामा दिलेले शिक्षणमंत्री



**धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा झाला आहे, पण त्यासाठी मला हिरो बनवू नका. ही चूक करू नका. ही चूक अजिबात करू नका. एकाच माणसाला हिरो बनवण्याच्या सवयीमुळेच देशाचं वाटोळं झालं आहे. तुम्ही एका माणसाला संविधानापेक्षा मोठं बनवून टाकलं, सर्व संस्थांपेक्षा मोठं बनवलं, प्रत्येक गोष्टीपेक्षा मोठं बनवून टाकलं. जेव्हा तुम्ही एका माणसाला मूळ मुद्द्यांपेक्षा, संस्थांपेक्षा आणि संविधानापेक्षा मोठं बनवता, तेव्हा तो माणूस देशाचं वाटोळंच करणार, त्यामुळे मला कोणीही हिरो बनवणार नाही.**

– **अभिजित दिपके** ,सीजेपी संस्थापक



**शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा हे देशाच्या शिक्षणव्यवस्थेची पुनर्बांधणी करण्याच्या दिशेने पडलेले एक महत्त्वाचे आणि सांकेतिक पाऊल आहे. आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांचे मी अभिनंदन करतो. देशातील संस्थांवर कब्जा मिळवू पाहणाऱ्या आणि संविधान नष्ट करू पाहणाऱ्या राजवटीविरुद्ध एकत्र लढण्याची गरज आहे.**

**– खा. राहुल गांधी**
**विरोधी पक्षनेते**



**आंदोलक विद्यार्थी आणि सरकारमध्ये सुसंवाद घडवून आणण्यासाठी आपण स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती आणि त्यांच्याशी झालेल्या या चर्चेचाच परिणाम म्हणून आज शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा झाला. दडपशाहीला न घाबरता अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहून सरकारला नैतिक जबाबदारी स्वीकारायला भाग पाडणारा हा लढा दिला. हा देशातील युवाशक्तीच्या एकजुटीचा मोठा विजय आहे. विरोधी पक्षातील प्रमुख नेत्यांनी ज्या पद्धतीने देशातील युवकांना नैतिक पाठबळ दिलं, त्याबद्दल विरोधी पक्षातील सर्व खासदारांचे मी आभार मानतो,**

**– खा. शरद पवार**

## आषाढी वारीत अनर्थ...

## एसआरपीएफ जवानाची गोळी झाडून आत्महत्या

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**पंढरपूर :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर लाखो वारकरी आणि भाविकांच्या उपस्थितीत पंढरपूर विठ्ठलमय झाले असतानाच एक अत्यंत दुर्दैवी घटना घडली. वारीच्या बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या राज्य राखीव पोलीस दल (एसआरपीएफ) जवानाने स्वतःच्या सर्व्हिस रायफलमधून गोळ्या झाडून जीवन संपविल्याची धक्कादायक घटना शनिवारी पहाटे घडली. या घटनेमुळे पोलीस दलासह संपूर्ण पंढरपूर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. रामेश्वर ध्रुपद साबणे (वय ३०)

(उर्वरीत पान ४ वर)

# प्रधानांच्या राजीनाम्यानंतर फडणवीसांना तातडीचे दिल्ली बोलावणे!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** नीट पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पदाचा राजीनामा दिल्यानंतर देशाच्या राजकारणात नव्या घडामोडींना वेग आला आहे. त्याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केंद्रीय नेतृत्वाने तातडीने दिल्लीला बोलावल्याची माहिती समोर आली असून, या दौऱ्यामुळे विविध राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी पहाटे पंढरपूर येथे आषाढी एकादशीनिमित्त पत्नी अमृता फडणवीस यांच्यासमवेत श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा केली. त्यानंतर दुपारी सोलापूरहून ते दिल्लीकडे रवाना झाले. सूत्रांच्या माहितीनुसार, ते दिल्लीत दाखल झाले असून त्यांच्या दौऱ्याचे नेमके कारण अद्याप अधिकृतपणे जाहीर करण्यात आलेले नाही.




धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी कोणतीही सार्वजनिक प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र, रविवारी नीट पेपरफुटीच्या मुद्द्यावर ठाकरे बंधूंनी मुंबईत 'तिरंगा मार्च'ची हाक दिल्याने राज्यातील राजकीय वातावरण आणखी तापले आहे. या पार्श्वभूमीवर फडणवीस यांच्या दिल्ली दौऱ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

दरम्यान, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी मोठा राजकीय दावा केला आहे. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या केंद्रीय शिक्षणमंत्रीपदासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचा विचार होऊ शकतो, असे त्यांनी म्हटले आहे. फडणवीस हे उच्चशिक्षित, कायद्याचे अभ्यासक आणि विविध विषयांवर अभ्यासपूर्ण भूमिका मांडणारे नेते असल्याने त्यांना केंद्रात महत्त्वाची जबाबदारी दिली जाऊ शकते, असा दावा राऊत यांनी केला.

तसेच, विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा वाढता दबाव लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा स्वीकारल्याचा दावाही राऊत यांनी केला आहे.या सर्व घडामोडींमध्ये काही दिवसांपूर्वी अमृता फडणवीस यांनी केलेले वक्तव्यही चर्चेत आले आहे. मला महाराष्ट्रातच राहायचे आहे. मी देवेंद्रजींना महाराष्ट्रातच ठेवणार, असे त्या म्हणाल्या होत्या. मात्र, त्यानंतर काही तासांतच मुख्यमंत्री फडणवीस यांना दिल्लीला तातडीने बोलावण्यात आल्याने या वक्तव्याचीही राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दिल्ली दौऱ्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले,

(उर्वरीत पान ४ वर)

### प्रल्हाद जोशींकडे शिक्षणमंत्री पदाचा अतिरिक्त भार

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी धर्मेंद्र प्रधान यांचा शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा मंजूर केला आहे. दरम्यान, यानंतर नवीन शिक्षणमंत्री म्हणून मोदी सरकारने प्रल्हाद जोशी यांच्याकडे शिक्षण मंत्रालयाची अतिरिक्त जबाबदारी सोपवली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी कॅबिनेट मंत्री प्रल्हाद जोशी यांच्याकडे शिक्षण मंत्रालयाचा कार्यभार सोपवण्याचे निर्देश दिले आहेत.**



**कुठलेही प्रश्न संवादाने सुटतात, चुकीच्या मार्गाने जाऊन प्रश्न सुटणार नाहीत. राजीनाम्यानंतर कोण हरलं आणि कोण जिंकलं हे मी मानत नाही. मात्र, समाजाच्या भलाईसाठी जे जे करता येईल ते करत रहा.**

– **अण्णा हजारे,**जेष्ठ समाजसेवक



**धर्मेंद्र प्रधान यांनी स्वतःहून राजीनामा दिला आहे. 'अँटी सोशल एलिमेंट घुसतात' असं वक्तव्य त्यांनी राजीनाम्यात केलं. २२ जणांनी आत्महत्या केली याबद्दल त्यांनी कुठलीही खंत व्यक्त केलेली नाही. पोलिसांनी केलेल्या अमानूष अत्याचारांचा राजीनाम्यात उल्लेख नाही. नुकसानभरपाई देणार याबाबत कुठे ही स्पष्टता यायला हवी होती.**

**– प्रकाश आंबेडकर**



**अखेर केंद्र सरकारला विद्यार्थ्यांच्या मागणी मान्य करावी लागली व सरकार नमले, हा संविधानाचा विजय आहे. शैक्षणिक क्षेत्रात पेपर फुटीचे अतिशय गलिच्छ प्रकार घडत असून येथून पुढे शैक्षणिक परीक्षेच्या बाबतीत असे गैरप्रकार घडू नये यासाठी शासनाने ठोस पावले उचलावी.**

**– ॲड अजित काळे**
(ज्येष्ठ कायदेतज्ञ व राज्य उपाध्यक्ष शेतकरी संघटना)



**गेले काही दिवस आपला देश अस्वस्थ आहे, याचे कारण आपल्याला सगळ्यांना माहीत आहे. अभिजीत दिपके आणि सगळ्या तरुणांचे आणि पालकांचे अभिनंदन. हा विषय फक्त राजीनाम पर्यंत नव्हता. गेले १२ वर्ष रोज काही तरी सुरू होते. नोटबंदी असेल किंवा काही. देशात जनता राहिली नाही असे हे लोक वागत आहे. हे सगळे झुरळ आहे असे सरकार बघत होते. मला डायलॉग आठवला 'एक मच्छर आदमी को..' तसे एक झुरळाने देश झुकविला...**

**उद्धव ठाकरे**

# प्राथमिक शिक्षक बँकेत तूघलकी निर्णय सभासदांवर लादण्याचा प्रकार

## शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांचे बेमुदत उपोषण

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेने जे तुघलकी निर्णय सभासदांवर लादण्याचा प्रकार चालवलेला आहे त्या विरोधात आज प्रत्यक्ष उपोषणाला शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष प्रविण ठुबे रघुनाथ झावरे व सुजित बनकर हे बेमुदत आमरण उपोषणाला बसलेले असून यांच्या समवेत रावसाहेब रोहोकले गुरुजी, डॉ. संजय कळमकर, आबासाहेब जगताप यांच्या उपस्थितीत उपोषणा आंदोलनाला शिक्षक बँक मुख्यालय येथे सुरुवात करण्यात आली. यावेळी जिल्हाभरातील अनेक सभासद उपस्थित होते.

अहिल्यानगर प्राथमिक शिक्षक बँकेमध्ये अतिशय मनमानी कारभार सूरु असून रिझर्व बँकेच्या अनेक आदेशाचे बनावट दाखले देऊन अनेक निर्णय सभासदांवर लादले जात आहेत, हा सभासदांवर अन्याय आहे. आमची प्रमुख मागणी आहे की वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी प्रस्तावित केलेल्या पोटनियम दुरुस्ती मध्ये रिझर्व बँकेच्या आदेशाचा दाखला देण्यात आला. ज्या पत्रामुळे बाहेर जिल्ह्यातील सभासद करण्याबाबत रिझर्व बँकेने सुचविले आहे. ते पत्र सभासदांसाठी सार्वजनिक करण्यात यावे.

बाहेर जिल्ह्यातील सभासद घेण्याचा संस्थेच्या अहिताचा आणि अघोरी प्रकार जर चेअरमन, व्हाईस चेअरमन व संचालक मंडळाने केला तर त्याचे होणाऱ्या परिणामांची जबाबदारी सध्याच्या संचालक मंडळावर राहतील असा उल्लेख पोटनियम दुरुस्ती मसुद्यामध्ये का केला नाही आणि अशा पोटनियम दुरुस्तीचा परिणाम संस्थेला भविष्यामध्ये भोगावे लागणार आहेत.मागच्या दाराने कंत्राटी कर्मचारी भरले जात आहेत. त्यांची यादी देण्याची लेखी मागणी शिक्षक संघाने शिक्षक बँक प्रशासनाकडे केलेली असूनही अद्याप पर्यंत कंत्राटी कर्मचाऱ्यांची यादी उपलब्ध करून दिलेली नाही.

**सर्वसामान्य सभासदांच्या मालकीचे अहिल्यानगर जिल्हा शिक्षक बँकेचे सभागृह सर्वसामान्य शिक्षकांनी वापर करू नये म्हणून कुलूपबंद करण्याचा आदेश देणाऱ्या प्रवृत्तींचा जाहीर निषेध करण्यात येत आहे.**

**– अमित पन्हाळे**
जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद जिल्हा शाखा अहिल्यानगर



सर्वसामान्य सभासदांना सात टक्के कर्ज व्याजदर करू असे सांगणाऱ्यांची चार वर्षे प्रत्यक्ष कृतीची सभासद वाट पाहत आहेत. कर्ज व्याजदर सात टक्के करण्याचा निर्णय संचालक मंडळांने तातडीने जाहीर करावा. त्याचप्रमाणे कर्ज निवारण निधीमध्ये जी नापरतावा ठेव ७५० रुपये कापली जात आहे. ती कपात बंद करण्यात आलेली नाही.या बाबतीत शिक्षक बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सकारात्मक निर्णय घेतला तर आमची चर्चेची तयारी आहे.परंतु सकारात्मक निर्णय होणार नसतील आणि केवळ आश्वासनांवर बोळवण होणार असेल तर आम्ही जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत आमरण उपोषणावर ठाम आहोत असे शिक्षक संघप्रणित मंडळाचे अध्यक्ष सुरेश निवडुंगे, बाळासाहेब सालके, राजकुमार साळवे, भास्कर नरसाळे .अविनाश निंभोरे गोकूळ कहाणे, शरद कोतकर विनोद देशमुख, बाबासाहेब पवार, चांगदेव ढेपले यांनी सांगितले आहे.

# झुरळ समजलेल्या पिढीने लोकशाहीचा आरसा दाखवला !

**संपादकीय उर्वरित**

दिल्लीच्या जंतर-मंतरवर सुरू झालेले आंदोलन काही दिवसांत देशव्यापी बनले. मुंबई, पुणे, कोलकाता, बिहार, राजस्थान, गुवाहाटीसह अनेक शहरांत विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उतरून एकच मागणी केली. शिक्षण व्यवस्थेतील अन्यायाला जबाबदार असलेल्यांची जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. विशेष म्हणजे, हे आंदोलन केवळ रस्त्यावरच झाले नाही; तर सोशल मीडियावरही तेवढ्याच प्रभावीपणे लढले गेले. इन्स्टाग्राम, रील्स, मीम्स आणि डिजिटल मोहिमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय चर्चेचा केंद्रबिंदू निर्माण केला. आजच्या काळात जनमत कसे घडवले जाते, याचा हा नवा अध्याय ठरला.

आंदोलनाच्या सुरुवातीला सरकारची भूमिका कठोर होती. आंदोलकांवर कारवाई झाली. लाठीचार्जसारख्या घटनांमुळे संताप आणखी वाढला. दबावाने आंदोलने संपतात, हा समज या वेळी फोल ठरला. उलट प्रत्येक कारवाईनंतर आंदोलन अधिक व्यापक झाले. देशभरातून विद्यार्थ्यांना विविध स्तरांतून पाठिंबा मिळू लागला. पालक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध विचारसरणीच्या नागरिकांनी विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे सहानुभूतीने पाहिले.

या संपूर्ण घटनाक्रमाने आणखी एक वास्तव समोर आणले. लोकशाहीत विरोधी पक्षांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवणे, जनतेचे प्रश्न संसदेत आणि रस्त्यावर मांडणे, सरकारला उत्तरदायी ठेवणे हे विरोधी पक्षांचे मूलभूत कर्तव्य आहे. मात्र, जेव्हा ही भूमिका प्रभावीपणे पार पडत नाही, तेव्हा समाजातील इतर घटक पुढे येतात. या वेळी ती जबाबदारी विद्यार्थ्यांनी स्वीकारली. हा संदेश केवळ सत्ताधाऱ्यांसाठी नाही; तर विरोधी पक्षांसाठीही तितकाच महत्त्वाचा आहे.

संविधानाने भारतातील प्रत्येक संस्थेची भूमिका निश्चित करून दिली आहे. शासन, प्रशासन आणि न्यायव्यवस्था या तिन्ही संस्था नागरिकांच्या सेवेसाठी आहेत. त्यांचा उद्देश सत्तेचे संरक्षण करणे नसून नागरिकांच्या अधिकारांचे रक्षण करणे हा आहे. त्यामुळे या संस्था जेव्हा आपल्या जबाबदाऱ्यांपासून दूर जातात किंवा जनतेमध्ये तसे चित्र निर्माण होते, तेव्हा नागरिकांना प्रश्न विचारण्याचा पूर्ण घटनात्मक अधिकार आहे. हा अधिकार लोकशाहीचा आत्मा आहे.

या आंदोलनाने आणखी एक गोष्ट स्पष्ट केली. तरुणाई ही केवळ उद्याचा भारत नाही; ती आजच्या भारताचीही निर्णायक शक्ती आहे. आजचा विद्यार्थी माहितीच्या युगात जगतो. तो प्रत्येक घडामोडीचा अभ्यास करतो, माहितीची पडताळणी करतो, डिजिटल माध्यमातून स्वतःचा आवाज राष्ट्रीय पातळीवर पोहोचवतो. त्यामुळे तरुणाईला कमी लेखण्याची चूक कोणत्याही सत्ताधाऱ्याने करू नये.

लोकशाहीत सरकार जिंकते किंवा हरते, यापेक्षा लोकशाहीची मूल्ये जिंकणे अधिक महत्त्वाचे असते. जबाबदारी स्वीकारणे ही पराभवाची नव्हे, तर लोकशाहीच्या परिपक्वतेची खूण असते. उत्तरदायित्व स्वीकारल्याने सरकार कमकुवत होत नाही; उलट लोकांचा विश्वास दृढ होतो. भविष्यात कोणतेही सरकार असो, कोणताही पक्ष सत्तेत असो, जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्याची किंमत मोजावी लागू शकते, हा स्पष्ट संदेश या घटनाक्रमाने दिला आहे.

# टाकळीभानच्या पुरातन, यादव कालीन विठ्ठल रूख्मिणी मंदिरात भाविकांची गर्दी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान**, श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील पुरातन यादव कालीन व प्रती पंढरपूर ओळखल्या जाणार्या व चर्तुभूज मूर्ती असलेल्या श्री.विठ्ठल-रुख्मिणी मंदिरात आज शनिवार दिनांक २५ जुलै रोजी आषाढी एकादशी निमित्त श्री. विठ्ठलाच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती त्यामुळे दर्शनासाठी मंदिरात सकाळ पासून रांग लागली होती.

येथील श्री. विठ्ठल रूख्मिणी मंदिर हे टाकळीभानसह परिसरातील गावांचे श्रद्धास्थान असल्याने टाकळीभान व परिसरातील श्रीरामपूर, भोकर, खोकर, कमालपूर, घुमनदेव, वांगी, खिर्डी, गुजरवाडी, कारवाडी, बेलपिंपळगाव, पाचेगाव आदी ठिकाणांहून भाविक दर्शनासाठी आले होते. श्रीरामपूर येथील डॉक्टर, वकील, व्यावसायिक यांनी पायी दिंडी काढून श्री.विठ्ठलाचे दर्शन घेतले. तसेच विविध विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दिंडी काढून दर्शन घेतले.



टाकळीभान येथील श्री. विठ्ठल रूख्मिणी मंदिरात आषाढी एकादशी निमित्त श्री. विठ्ठलाच्या दर्शनासाठी सकाळपासून रांग लागली होती. प्रांताधिकारी किरण सावंत व मनिषा सावंत यांचे हस्ते आरती करण्यात आली.

आषाढी एकादशी निमित्त श्रीरामपूर येथील योगेश देशपांडे या भाविकाने खिचडीचे वाटप केले. तसेच उपसरपंच कान्हा खंडागळे यांचे वतीने केळी वाटप तसेच रावसाहेब गायकवाड तसेच आदी भाविकांनीही फराळाचे वाटप केले.

पहाटे ४. ३० ते ५ यावेळेत श्री. विठ्ठल रूख्मिणी मातेला गंगाजलाने स्नान व अभिषेक करण्यात आला. ५.३० ते ६ वाजता या वेळेत प्रांताधिकारी किरण सावंत व सौ.मनिषा सावंत यांच्या हस्ते उत्सव मूर्तीची पूजा व आरती करण्यात आली. दुपारी १२ वाजता आरती झाली त्यानंतर भजन झाले. व रात्री ८ते ११ या वेळेत ह. भ. प. मच्छिंद्र महाराज चोरमले यांचे किर्तन झाले. दर्शनासाठी उपस्थित श्रीरामपूरचे प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्ष करण ससाने, जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, माजी सभापती डॉ. वंदनाताई मुरकुटे ,प्रांताधिकारी किरण सावंत व सौ.मनिषा सावत यांचा देवस्थान ट्रस्टच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष नानासाहेब पवार, सचिव नानासाहेब लेलकर, विश्वस्त बापूसाहेब पटारे, डरकानाथ भालसिंग, सोसायटीचे माजी अध्यक्ष एकनाथ पटारे, राजेंद्र माने, सुरेश बनकर, गोपीनाथ पवार, विष्णूपंत खंडागळे, पूजारी विजय देवळालकर. तसेच भाविक व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी बोलतांना प्रांताधिकारी सावंत म्हणाले की, पांडूरंगा बळीराजाला सुख समृधी लभू दे व भरपूर पाऊस पडू दे असे साकडे आपण विठ्ठलाला घातल्याचे त्यांनी

## आषाढी एकादशीनिमित्त कलादर्शन ; तांदळाच्या दाण्यावर अवतरले पांडुरंग

**गौरव डेंगळे । राष्ट्र सह्याद्री**

**नगर :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त गोव्याच्या बिचोली येथील रिया रमेश कांबळी हिने आपल्या अप्रतिम कलागुणांची अनोखी झलक सादर केली आहे. तिने तांदळाच्या अवघ्या एका दाण्यावर भगवान श्री विठ्ठलांचे सुंदर चित्र साकारत मायक्रो आर्टच्या माध्यमातून भक्ती आणि कलेचा अद्वितीय संगम घडवून आणला. अत्यंत सूक्ष्म आकारात साकारलेली ही कलाकृती रियाच्या संयम, बारकाई, कल्पकता आणि कलाप्रेमाची साक्ष देते. एवढ्या लहान जागेत विठ्ठलांचे भावपूर्ण चित्र रेखाटणे हे अत्यंत कौशल्यपूर्ण कार्य असून तिच्या या कलाकृतीने सर्व स्तरांतून कौतुकाची थाप मिळवली आहे.आषाढी एकादशीच्या निमित्ताने विठ्ठलभक्तीला अनोख्या कलात्मक अभिव्यक्तीतून साकारलेल्या या मायक्रो आर्टने भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि सर्जनशीलतेचा सुंदर संदेश दिला आहे. तरुण पिढीतील कलागुणांना प्रेरणा देणारी ही कलाकृती भक्ती, समर्पण आणि कलात्मक उत्कृष्टतेचे प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.रिया रमेश कांबळी हिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे गोव्यासह संपूर्ण देशाला अभिमान वाटावा, अशी भावना अनेक कला रसिक आणि विठ्ठलभक्त व्यक्त करत आहेत.

## भरधाव वाहनाची ट्रॅक्टरला मागून धडक, अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** नेवासा तालुक्यातील कांगोणी फाटा परिसरात भरधाव अज्ञात वाहनाने ट्रॅक्टरला पाठीमागून जोरदार धडक दिल्याची घटना २४ जुलै रोजी पहाटे घडली. या अपघातात ट्रॅक्टरवरील चालक व इतर ४जण जखमी झाले असून अपघातानंतर वाहनचालकाने घटनास्थळावर न थांबता अपघाताची माहितीही न देता पसार झाल्याने शनिशिंगणापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, देवीदास अर्जुन राठोड (वय ३०, रा. मुकुंदवाडी तांडा, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर) यांनी शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. २४ जुलै रोजी पहाटे सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास कांगोणी फाटा (ता. नेवासा) येथील साईछत्र हॉटेलच्या पुढे,अहमदनगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर हा अपघात झाला. शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात दाखल फिर्यादीनुसार, अज्ञात वाहनचालकाने स्वतःच्या वाहनावर नियंत्रण न ठेवता निष्काळजीपणे व भरधाव वेगाने वाहन चालवून ट्रॅक्टरला पाठीमागून जोरदार धडक दिली. या धडकेत फिर्यादी देविदास राठोड यांच्या ट्रॅक्टर मधील चौघे जखमी झाले. तसेच ट्रॅक्टरचेही नुकसान झाले आहे. अपघातानंतर संबंधित वाहनचालकाने जखमींना मदत न करता अथवा पोलिसांना माहिति न देता घटनास्थळावरून पलायन केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या प्रकरणी शनिशिंगणापूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक दिपक धनवटे करीत आहेत.

## आषाढी एकादशीनिमित्त श्री क्षेत्र निझर्नेश्वर येथे महापूजा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** । श्री क्षेत्र निझर्नेश्वर येथे आषाढी एकादशीनिमित्त शनिवारी (दि. २५) महादेव मंदिर आणि विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सालाबादप्रमाणे याही वर्षी सकाळी विधिवत अभिषेक व महापूजा उत्साहात पार पडली. या धार्मिक सोहळ्याची सुरुवात महापूजेने झाली. निझर्नेश्वर मंदिराचे विश्वस्त बाळासाहेब कचेश्वर जोंधळे आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सुजाता जोंधळे यांच्या हस्ते, गुरु उदय कुलकर्णी यांनी शास्त्रोक्त पध्दतीने व विधिवत मंत्रोच्चारात पूजा संपन्न केली. तत्पूर्वी, विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीस नवीन वस्त्र परिधान करण्यात आली, त्यानंतर मंत्रोपचारांच्या गजरात शास्त्रयुक्त अभिषेक



घालण्यात आला. दरम्यान, यावेळी देवस्थानचे अध्यक्ष बबन पवार, सचिव गंगाधर वायकर, कोकणगावच्या सरपंच आशाताई जोंधळे, संजय जोंधळे, बाळासाहेब ढगे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवभक्त व वारकरी उपस्थित होते.

# सुजाता स्कूलमध्ये आषाढी एकादशी उत्साहात साजरी

## बालदिंडीने परिसर भक्तिमय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

सोनई : आषाढी एकादशीच्या पवित्र पर्वानिमित्त सुजाता स्कूलमध्ये विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून उत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये भक्ती, संस्कार, शिस्त आणि भारतीय संस्कृतीची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित कार्यक्रमाला पालक व ग्रामस्थांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाची सुरुवात श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन व महाआरतीने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी ''ज्ञानोबा-तुकाराम'', ''पांडुरंग हरी'' आणि ''राम कृष्ण हरी''च्या अखंड गजरात आकर्षक बालदिंडी काढून संपूर्ण परिसर भक्तिमय केला. वारकरी वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थ्यांनी टाळ, मृदंग, वीणा, भगवी पताका आणि तुळशी वृंदावनासह दिंडीत सहभाग घेतला. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव आणि संत एकनाथ यांच्या अभंगांचे सादरीकरणही करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी संतांच्या जीवनावर आधारित नाटिका, अभंग गायन, भारूड, भजन, लेझीम, नृत्य तसेच भाषणांद्वारे आषाढी एकादशीचे धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व प्रभावीपणे मांडले. शाळेचे सहशिक्षक सोमनाथ तुपे व सुजाता आढाव यांनी आषाढी वारी, पायी दिंडी, विठ्ठल-पुंडलिक कथा तसेच वारकरी संप्रदायातील समता, सेवा, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश विद्यार्थ्यांना समजावून सांगितला. शाळेच्या परिसरात विठ्ठल-रुक्मिणी मंदिराची आकर्षक सजावट, रांगोळ्या आणि वारकरी संस्कृतीचे दर्शन घडविणारे देखावे उभारण्यात आले होते. संस्थापक किरण सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दिंडीचा अनुभव देण्यात आला. प्राचार्या ज्योती सोनवणे यांनी आषाढी एकादशीचे महत्त्व विशद केले. सूत्रसंचालन उर्मिला साळुंखे यांनी, तर आभार प्रदर्शन दीपाली दरंदले यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन सचिन चांडे यांनी केले असून, यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. भक्ती, संस्कार आणि सांस्कृतिक मूल्यांची जोपासना करणारा हा उत्सव उपस्थितांच्या स्मरणात राहील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



## अजिंक्य स्कूलमध्ये रंगली पंढरीची वारी ;विठ्ठलनामाने परिसर दुमदुमला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पढेगाव :** आषाढी एकादशीच्या निमित्ताने पढेगाव येथील अजिंक्य इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये पंढरीची वारी उत्साहात साजरी करण्यात आली. वारकरी वेशभूषेतील विद्यार्थ्यांची बालदिंडी, टाळ-मृदुंगाचा निनाद, लेझीमचे तालबद्ध सादरीकरण आणि अभंग-भक्तिगीतांनी संपूर्ण शाळा परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. विद्यार्थ्यांनी डोक्यावर तुळशी वृंदावन, हातात भगवे ध्वज घेऊन दिंडीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. ''ज्ञानोबा-तुकाराम'' आणि ''विठ्ठल... विठ्ठल...''च्या अखंड जयघोषात दिंडीने परिसरात भक्तीचा जागर घडविला. विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आदी संतांच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरेचे आकर्षक दर्शन घडविले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लेझीम, अभंग आणि भक्तिगीतांना उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. आधुनिक शिक्षणासोबत विद्यार्थ्यांना महाराष्ट्राची संतपरंपरा, वारकरी संस्कृती आणि भारतीय संस्कारांची ओळख व्हावी, तसेच भक्तिभाव, एकात्मता आणि सांस्कृतिक मूल्यांची जपणूक व्हावी या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब तोरणे, उपाध्यक्षा शीला तोरणे, सचिव प्रदीप आहेर, करणजी नवले, मुख्याध्यापक अभिजीत खरात, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## महात्मा गांधी संकुलाच्या मुलींनी गिरवले निवडणुकीचे धडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** निवडणूक प्रक्रिया काय असते, मतदान केंद्र, ईव्हीएम मशीन, मतदान अधिकारी यांच्या समवेत मतदान कसे करावे याबद्दलचे धडे प्रवरानगर येथील महात्मा गांधी विद्यालय व कन्या विद्यालयात नुकतेच वर्गनिहाय धडे विद्यार्थ्यांना देण्यात आले. लोकशाही पद्धतीने होणारी प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया विद्यार्थ्यांना अनुभवण्यास मिळाली. या निवडणूक प्रक्रियेत प्रत्येक वर्गाचे वर्गमंत्री मंडळ तयार करण्यात आले. शिक्षकांच्या संकल्पनेतून शालेय वर्गमंत्री मंडळाची निवडणूक घेण्याचे नियोजन केले गेले. मोबाईल वरील ईव्हीएम मशीन मधून प्रत्यक्षात डिजिटल बोर्ड तयार निवडणूक घेतली गेली.

इच्छुक उमेदवारांची घोषणा करण्यात आली. उमेदवारांना चिन्हे देण्यात आली. विद्यार्थ्यांना ईव्हीएम मशीनवर मतदान कसे करायचे याचे धडे वर्गातून इंटरॲक्टिव्ह बोर्डवर देण्यात आले. विद्यार्थ्यांना मॉकपोल दाखवून अधिकारी, एक-दोन-तीन आणि केंद्राध्यक्ष यांच्या उपस्थितीत मतदान गोपनीय पद्धतीने घेण्यात आले. कामकाज काय असते याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. बॅलेट बटन दाबताच पसंतीच्या उमेदवारापुढील बटन दाबल्यावर हिरवा लाईट लागतो आणि विशिष्ट आवाज येतो. ही प्रक्रिया अनुभवताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान दिसून आले. याशिवाय मतदान प्रक्रियेतील पारदर्शकता आणि प्रत्यक्ष अनुभव घेऊन विद्यार्थी भारावून गेले. मुख्याध्यापिका नलिनी जाधव आणि माधुरी वडघुले यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवडणूक प्रक्रिया आनंददायी आणि उत्साहात पार पडली. यावेळी संगिता उगले, प्रफुल्ल नव्हाळे, सुजाता ठाकरे, शैलेजा सातपुते, विजयश्री कदम, दिपाली आंबेकर, नंदादेवी बैसाणे, मीनाक्षी गांगुर्डे, कमल थिटे, सुवर्णा भोसले, प्रमिला पंडोरे या सर्व शिक्षकांनी निवडणूक अधिकारी म्हणून उत्तम कर्तव्य बजावले. ही प्रक्रिया राबविण्यामध्ये मुख्य निवडणूक अधिकारी विलास गभाले यांनी विशेष परिश्रम घेतले. तर पोलीस कर्मचारी वैष्णवी वायाळ आणि सायली हिवाळे यांनी काम पाहिले.

इ.५ वी ते १० वी अखेर गायत्री आवारी, स्नेहल पंडित, संध्या वाघडकर ( बिनविरोध) मानवी गायकवाड, अपेक्षा उबाळे, अर्पिता साळवे, कीर्ती पाटील, वैष्णवी वायाळ, अलिशा शेख, अंतरा सातदिवे या उमेदवार विजयी झाल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली.




## भक्तांना सक्ती करणाऱ्या लटकूंवर शिंगणापूर पोलिसांची कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिंगणापूर :** शनिशिंगणापूर ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक धनवटे सध्या कमिशन एजंट बाबतीत एक्शन मोडवर असल्याचे दिसून येत आहे. या बाबत सविस्तर माहिती अशी की भाविकांच्या वाहनाला आडवे उभे राहून आपल्याच दुकानावर पुजा साहित्य घेण्यासाठी आग्रह करणाऱ्या प्रसंगी दमबाजी करणाऱ्या कमिशन एजंटवर येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक धनवटे यांनी आपल्या सहकाऱ्यांना कारवाईच्या सुचना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने दि. २२ रोजी पार्कंग समोरील रोडवर सचिन भाऊसाहेब पवार (वय २१) रा. बेल्हेकरवाडी तसेच गौरव प्रशांत भागवत (वय २०) रा. सोनई हे दोघे जण भाविकांच्या वाहनाला रस्त्यावर आडवे उभे राहून आपल्या दुकानात पुजा साहित्य खरेदीसाठी आग्रह करत होते. त्या अनुषंगाने त्यांच्यावर कारवाई करत पोलीस कॉस्टेबल रविकांत गर्जे यांच्या फिर्यादी नुसार गुन्हा र. नं. नं. सह बिएन एस चे कलम १२६ (२), २२३ अन्वये दाखल करण्यात आला आहे.

## आषाढी एकादशीनिमित्त पुणतांब्यात चांगदेव महाराजांच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** आषाढी एकादशीनिमित्त शनिवारी पुणतांबा येथे श्री चांगदेव महाराजांच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली. गोदावरी नदीला पाणी आल्याने अनेक भाविकांनी पवित्र स्नानाचा लाभ घेतला. पहाटेपासूनच चांगदेव महाराज मंदिरात देवस्थानच्या वतीने महापूजा, अभिषेक व धार्मिक विधी पार पडले. आषाढी एकादशीच्या दिवशी चांगदेव महाराज आणि श्री विठ्ठलाचे दर्शन घेणे शुभ मानले जात असल्याने दिवसभर दर्शनासाठी भाविकांची मोठी रांग लागली होती. गावातील विठ्ठल मंदिरातही भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली. बाजारपेठेतील विठ्ठल मंदिरापासून पारंपरिक पायी दिंडी सोहळा काढण्यात आला. गावातून प्रदक्षिणा घालत दिंडी काढण्यात आली. टाळ-मृदुंगाच्या गजरात ''विठ्ठल... विठ्ठल...''च्या अखंड नामस्मरणाने परिसर भक्तिमय झाला. दिंडीनंतर भाविकांना फराळाचे वाटप करण्यात आले. या सोहळ्यात भोला उदावंत, शिवाजी प्रधान, सागर पानसरे, निलेश दुर्गुडे, बाळासाहेब सांबारे, एकनाथ धनवटे, दत्तात्रय गायकवाड,



कृष्णा ढोक चव्हाण यांच्यासह विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाचे कार्यकर्ते आणि असंख्य भाविक सहभागी झाले.

### पुरामुळे रस्ते बंद; वाहतुकीवर परिणाम

गोदावरीला आलेल्या पुरामुळे नदीकाठावरील काही मंदिरे पाण्याखाली गेली असून वसंत बंधाऱ्यावरून पाण्याचा विसर्ग सुरू आहे. पुणतांबा-कोपरगाव मार्ग अद्याप बंद असून शिर्डी मार्गावरील पाणी ओसरल्याने तो वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. नाशिक पाणलोट क्षेत्रातील पावसाचा जोर कमी झाल्याने गोदावरीत सुमारे ६० हजार क्युसेक पाण्याचा प्रवाह सुरू आहे. रविवारी सकाळपर्यंत पुणतांबा-कोपरगाव मार्ग सुरू होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. मार्ग बंद असल्याने एसटी महामंडळाच्या बससेवेलाही फटका बसला.

### पुराचे पाणी पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी

गोदावरीच्या पुराचे विहंगम दृश्य पाहण्यासाठी ग्रामस्थ व भाविकांनी चांगदेव मंदिर, अहिल्याबाई घाट आणि ब्राह्मण घाट परिसरात मोठी गर्दी केली. विशेषतः युवकांनी या ठिकाणी फोटोसेशनसाठी मोठी उपस्थिती लावल्याचे चित्र दिवसभर पाहायला मिळाले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# आषाढी एकादशीनिमित्त माऊलींच्या पैस खांबाचे हजारो भाविकांनी घेतले दर्शन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** आषाढी शुद्ध देवशयनी एकादशीच्या निमित्ताने संत ज्ञानेश्वर महाराजांची कर्मभूमी व ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे रचनास्थान असलेल्या तीर्थक्षेत्र नेवासा येथे हजारो भाविकांनी संत ज्ञानेश्वर माऊलींचे मूर्तीमंत रूप असलेल्या पैस खांबाचे दर्शन घेतले. माऊली माऊलीच्या नामघोषाने परिसर दुमदुमला होता.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने पहाटे ४ वाजता देवस्थानचे प्रमुख महंत वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली वेदमंत्राच्या जयघोषात संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पैसखांबास महाअभिषेक करण्यात आला. यावेळी रामकृष्ण हरि प्रभात फेरीचे मार्गदर्शक अनंता नळकांडे व सविता नळकांडे, विनोद नळकांडे व सुवर्णा नळकांडे, श्रीमती सत्वशीला दिगंबर नळकांडे यांच्या हस्ते पूजा करण्यात आली.


(छाया- सुधीर चव्हाण नेवासा)

पहाटेच्या सुमारास झालेल्या पूजेच्या प्रसंगी संत ज्ञानेश्वर मंदिर देवस्थानच्या वतीने जनसंपर्क अधिकारी माऊली सेवेकरी आशिष कावरे, विष्णू जाधव, गोरख भरत शेळके देवस्थानच्या वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थी उपस्थित होते. देवस्थानच्या वतीने श्रीफळ प्रसाद देऊन यजमानांचा सन्मान करण्यात आला. या निमित्ताने नेवासा तालुक्याचे आमदार विठ्ठलराव लंघे यांनी भेट देऊन माऊलींच्या पैस खांबाचे दर्शन घेतले. विठुरायाची आषाढी एकादशी असल्याने पहाटे तीन वाजेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. या गर्दीचे रूपांतर मोठ्या दर्शन बारीत झाले. भाविकांना दर्शन घेता यावे म्हणून मुख्य बारीबरोबरच मुख्य प्रवेशद्वारापासून मुखदर्शनाची व्यवस्था करण्यात आली होती.

**कामिका एकादशी सोहळ्याची आता तयारी**

रविवारी रोजी नेवासा येथील संत ज्ञानेश्वर माऊलींच्या कामीका एकादशीच्या लाखो भाविक दर्शनासाठी येणार असल्याने मोठी यात्रा भरणार या एकादशीला भरणार असल्याने त्यादृष्टीने जोरदार तयारी सुरू आहे.

तर मंदिर प्रांगणातील गुरुवर्य बन्सी महाराज समाधी मंदिर, श्री दत्त मंदिर परिसर गर्दीने फुलून गेला होता.

माऊलींच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांचे देवस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, विश्वस्त विश्वासराव गडाख, गायनाचार्य ज्ञानेश्वर माऊली शिंदे, विश्वस्त रामभाऊ जगताप, जनसंपर्क अधिकारी आशिष कावरे, संतसेवक योगेश रासने यांनी स्वागत करून सेवा दिली. आषाढी एकादशीच्या निमित्ताने मंदिर प्रांगणात अनेक दुकाने थाटली गेल्याने परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. सायंकाळी पुणे येथील माऊली भक्त अथर्व वडापूरकर व सौ. पूजा वडापूरकर यांच्या हस्ते आरती करण्यात आली.

## बळीराजाच्या शिवारात हिरवाई नांदो : आ. खताळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** आषाढी एकादशीच्या पवित्र पर्वानिमित्त संगमनेरचे आमदार अमोल खताळ यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी राज्यातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि समाजाच्या सुख-समृद्धीसाठी मनोभावे प्रार्थना केली. यंदा राज्यात भरपूर पाऊस पडावा, शेतकऱ्यांची पिके जोमाने यावीत, प्रत्येकाच्या घरात आनंद, समाधान आणि भरभराट नांदावी तसेच सर्वांना उत्तम आरोग्य लाभावे, अशी प्रार्थना त्यांनी श्री विठ्ठलाच्या चरणी अर्पण केली.



आषाढी एकादशीच्या निमित्ताने आमदार खताळ यांनी संगमनेर शहरातील अकोले बायपास रोडवरील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर तसेच वाघापूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात जाऊन श्री विठ्ठलाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी विधिवत पूजा-अर्चा करून राज्याच्या प्रगतीसह शेतकरी, कष्टकरी, वारकरी आणि सर्व समाजबांधवांच्या कल्याणासाठी प्रार्थना केली. यावेळी मंदिर समितीच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार अमोल खताळ यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. मंदिर परिसरात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विठ्ठलनामाचा गजर करत भक्तिमय वातावरण निर्माण केले होते. आमदार खताळ यांनीही भाविकांशी संवाद साधत सर्वांना आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना आमदार खताळ म्हणाले की, आषाढी एकादशी हा भक्ती, सेवा, समर्पण आणि मानवतेचा संदेश देणारा अत्यंत पवित्र दिवस आहे. संतांच्या विचारांनी प्रेरित होऊन समाजात बंधुभाव, सद्भावना आणि सेवाभाव वृद्धिंगत व्हावा, हीच या दिवसाची खरी शिकवण आहे. यंदा राज्यात समाधानकारक पाऊस पडून बळीराजाच्या आशा पूर्ण व्हाव्यात, शेतकऱ्यांच्या शिवारात हिरवाई बहरावी, प्रत्येक कुटुंब सुखी, समाधानी आणि समृद्ध व्हावे, तसेच सर्वांच्या जीवनात आरोग्य, आनंद आणि भरभराट नांदावी, अशी प्रार्थना श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी केली आहे.

## आषाढी एकादशीनिमित्त संस्कार संस्कृती आणि भक्तीचा संगम



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** केडगाव येथील ज्ञानसाधना एज्युकेशन फाउंडेशन संचलित लंडन किड्स प्री स्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त पारंपरिक दिंडी सोहळा मोठ्या भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विठोबा माऊली... ज्ञानराज माऊली तुकाराम...या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. वारकरी परंपरेचा वारसा आणि महाराष्ट्राची संतपरंपरा चिमुकल्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या दिंडी सोहळ्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

दिंडीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर माऊली, संत तुकाराम महाराज, संत मुक्ताबाई, मीराबाई तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वेशभूषेत आकर्षक सहभाग नोंदविला. टाळ-मृदुंगाच्या गजरात, भगवे ध्वज हातात घेऊन आणि विठ्ठल नामाच्या गजरात चिमुकले वारकरी उत्साहाने चालत होते. यावेळी बाल वारकऱ्यांनी सादर केलेला रिंगण सोहळा हा दिंडीचा मुख्य आकर्षण ठरला आणि उपस्थितांची मनं जिंकून गेला.

शाळेपासून शाहूनगर बसस्टॉप मार्गे माधवनगर येथील विठ्ठल मंदिरापर्यंत पायी दिंडी काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, सामाजिक ऐक्य आणि संस्कार यांचा संदेश देणारे फलक हातात घेतले होते. मार्गात ठिकठिकाणी ग्रामस्थांनी दिंडीचे स्वागत करून पालखीचे पूजन केले.

## मुठेवाडगावातील १८९ शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या पहिल्या यादीत

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** महाराष्ट्र शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत श्रीरामपूर तालुक्यातील मुठेवाडगाव येथील पात्र शेतकऱ्यांची पहिली यादी आषाढी एकादशीच्या शुभमुहूर्तावर प्रसिद्ध करण्यात आली. या यादीत मुठेवाडगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे १३७, प्रगत सोसायटीचे ३ आणि बँक ऑफ महाराष्ट्रचे ४९ असे एकूण १८९ शेतकरी पात्र ठरले असून त्यांच्या आधार प्रमाणीकरण (केवायसी) प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली. पंचनामा करून ही यादी अधिकृतपणे प्रसिद्ध करण्यात आली.

यावेळी भाजपचे तालुका सरचिटणीस तथा माजी चेअरमन डॉ. शंकरराव मुठे यांनी राज्य सरकारने संकटग्रस्त शेतकऱ्यांना दिलेला शब्द पाळत कर्जमुक्तीची पहिली यादी जाहीर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले. ताके, प्रगत सोसायटीचे अध्यक्ष भाऊसाहेब मुठे, हभप रामभाऊ मुठे, निळकंठ मुठे, विठ्ठलराव मुठे, रमेशराव नाईक, सचिव नानासो मुठे, विश्वास क्षिरसागर, जालिंदर मुठे, योगेश घोडेचोर, किरण मुठे तसेच ग्रामस्थ, सभासद आणि बँक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आषाढी वारी दिंडीत सामील झाले चिमुकले वारकरी; पाथरे बु. परिसर भक्तिमय

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी :** आषाढी एकादशीचे औचित्य साधून श्री छत्रपती शिवाजी प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय, पाथरे बु. येथे पारंपरिक आषाढी वारी दिंडी सोहळा उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला. वारकरी वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थ्यांनी डोक्यावर तुळशीवृंदावन, हातात भगवे झेंडे, टाळ, मृदुंग, वीणा व पताका घेऊन ज्ञानोबा माऊली... तुकाराम तसेच पुंडलिक वरदा हरी विठ्ठलच्या जयघोषात दिंडीत सहभाग घेतला. हरिनामाच्या गजराने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.



फुलांनी सजविलेल्या विठ्ठल-रखुमाई यांच्या पालखीचे आकर्षण विशेष ठरले. विद्यार्थ्यांनी पालखी खांद्यावर घेऊन गावातून मिरवणूक काढली. पालखीसमोर टाळ-मृदुंगाचा निनाद आणि मागे अभंग म्हणत चालणाऱ्या चिमुकल्या वारकऱ्यांमुळे उपस्थितांना प्रत्यक्ष वारीचा अनुभव मिळाला.

यावेळी ग्रामपंचायतीचे सरपंच उमेश घोलप, ग्रामस्थ व पालक मोठ्या संख्येने सहभागी झाले. सरपंच घोलप यांनी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून विद्यालयाच्या संस्कारक्षम उपक्रमाचे कौतुक केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सुस्मिता विखे पाटील यांच्या प्रेरणेने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या विचारांबरोबरच वारकरी संप्रदायातील समता, बंधुता, भक्ती, शिस्त व मानवतेचे संस्कार रुजविणे हा उपक्रमाचा उद्देश असल्याचे प्राचार्य बारगुजे यांनी सांगितले. कार्यक्रमासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहकार्य केले.

## रामपूरमध्ये बालवारकरी दिंडीने रंगला भक्तीचा सोहळा



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**कोल्हार :** आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला राहुरी तालुक्यातील रामपूर येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आणि प्रवरा माध्यमिक विद्यालयाच्या वतीने संयुक्तपणे बालवारकरी दिंडी, ग्रंथ दिंडी, वृक्ष दिंडी आणि पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ आणि वारकऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण गाव भक्तिमय वातावरणाने भारावून गेले.

दिंडीची सुरुवात ग्रामदैवत श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिरासमोर पारंपरिक रिंगण सोहळ्याने झाली. जय जय राम कृष्ण हरी, जय विठ्ठल, जय हरी विठ्ठल आणि ज्ञानोबा-तुकारामच्या अखंड नामघोषाने परिसर दुमदुमून गेला. पर्यावरणप्रेमी ह.भ.प. डॉ. अनिल लोखंडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून झाडे लावा, झाडे जगवाचा संदेश देण्यात आला. मार्गदर्शन करताना त्यांनी संत परंपरेचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत अध्यात्म आणि संस्कारही जोपासावेत, असे आवाहन केले. यावेळी विठ्ठल, रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि संत सावता महाराज यांच्या वेशभूषेतील बालकलाकारांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास मुख्याध्यापक संजय लाटे, दादा वडितके, शिक्षक चांगदेव चव्हाण, रामदास ब्राम्हणे, अर्जुन कोऱ्हाळे, प्रमोद विखे, विलास गिते यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थ, पालक आणि महिला-पुरुष वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भक्ती, संस्कार आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांच्या विशेष कौतुकास पात्र ठरला.

# दिंडी, रिंगण सोहळा व हरिनामाचा गजर

## गौतम पब्लिक स्कूलचा परिसर दुमदुमला

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** आषाढी एकादशीचे औचित्य साधत सालाबादप्रमाणे याहीवर्षी गौतम पब्लिक स्कूलमध्ये वारकरी परंपरेचा संस्कारमय वारसा जपत शालेय दिंडी, रिंगण सोहळा आणि हरिनाम गजरातून निर्माण झालेले भक्तीमय वातावरण पुन्हा एकदा अनुभवायला मिळाले. विठ्ठल-रुक्मिणीच्या नामस्मरणाने, टाळ-मृदंगाच्या गजराने आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने संपूर्ण शाळा परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. धार्मिक परंपरा आणि आधुनिक शिक्षणाचा सुंदर संगम या उपक्रमातून पाहायला मिळाला.

**शिक्षण व संस्कार यांची सांगड घालणे हेच आमचे ध्येय : काळे**

आषाढी एकादशी ही श्रद्धा, भक्ती आणि संस्कारांची परंपरा जपणारा पवित्र उत्सव आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत भारतीय संस्कृती, वारकरी परंपरा आणि नैतिक मूल्यांचे संस्कार मिळावेत, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. गौतम पब्लिक स्कूलमध्ये दरवर्षी साजरा होणारा आषाढी एकादशीचा दिंडी व रिंगण सोहळा हा धार्मिक श्रद्धा, भारतीय संस्कृती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यांचा सुंदर संगम असून अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये भक्ती, शिस्त, सेवाभाव आणि सामूहिकतेची भावना दृढ होते. शिक्षण आणि संस्कार यांची सांगड घालणे हेच आमचे ध्येय असून भविष्यातही असे संस्कारमय उपक्रम सातत्याने राबविण्यास संस्था कटिबद्ध आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ. रेखा जाधव यांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे महत्त्व, वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा याविषयी मार्गदर्शन केले. कला-संगीत शिक्षक गोरक्षनाथ चव्हाण आणि संगीत विभागातील विद्यार्थ्यांनी विठ्ठल नामाचा अखंड गजर, अभंग, भजने व गवळणी सादर करत उपस्थितांना भक्तीमय वातावरणाची अनुभूती दिली. यावेळी प्राचार्य नूर शेख यांनी सर्व विद्यार्थी, शिक्षक व पालकांना आषाढी एकादशीच्या शुभेच्छा देत विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या प्रतिमेचे विधिवत पूजन तसेच अश्वपूजन केले. त्यानंतर टाळ-मृदंगाच्या निनादात आणि 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषात विद्यार्थ्यांची दिंडी वाजत-गाजत हनुमान ग्राउंडकडे रवाना झाली.



या भक्तिमय वातावरणामुळे उपस्थित पालक, शिक्षक आणि नागरिकांनाही पंढरीच्या वारीचा अनुभव मिळाला. दरवर्षीप्रमाणे यंदाही विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेता दिंडी व रिंगण सोहळ्याचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले होते. संस्थेचे चेअरमन मा.आ.अशोकरावजी काळे, विश्वस्त आ. आशुतोष काळे, सचिव चैतालीताई काळे, इन्स्पेक्टर नारायण बारे, संस्थेचे सर्व सदस्य तसेच पालकांनी कार्यक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या संस्कारक्षम उपक्रमाचे अभिनंदन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी फिजिकल डायरेक्टर रमेश पठारे तसेच ज्योती शेलार, राजेंद्र आढाव, इसाक सय्यद, नसीर पठाण, जगदीश गिरी आणि प्रकाश भुजबळ यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी रमेश पठारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## द•ख•ल



### कांगोणीत बालकाच्या वेशभूषानी वेधले ग्रामस्थांचे लक्ष

**सोनई :** मुळा एज्युकेशन संस्थेच्या कांगोणी येथील श्री समर्थ रामदास स्वामी माध्यमिक विद्यालय मध्ये बाल दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या मिरवणूक मध्ये विठ्ठल -रुख्मिणीचे हुबेहूब मूर्ती विद्यार्थी व विद्यार्थिनी वेशभूषा परिधान करून ग्रामस्थांचे लक्ष वेधले. यावेळी लेझीम पथक, टाळ मृदंगाच्या गजरामध्ये गावातून फेरी काढण्यात आली.तसेच विठ्ठल रुक्मिणी सुद्धा या असणाऱ्या कार्यक्रमास सहभागी झाली होती. विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मख्याध्यापक बाळासाहेब सोनवणे यांच्या सह शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर सेवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. भावभक्ती वातावरणात बाल दिंडीचे स्वागत करण्यात आले.

### गोदाकाठच्या चक्रधर स्वामी मंदिरात भाविकांची गर्दी

**माळवाडगांव :** गोदावरी नदीच्या काठावरील महानुभांव पंथाची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र कमालपूर (डोमेग्राम) येथील चक्रधर स्वामी मंदीरात आज आषाढी एकादशी निमित्ताने हजारो भाविकांनी गर्दी केली होती. श्रीरामपूर तालुक्याचे पूर्व गोदाकाठ परिसरात महानुभांव संप्रदायाची काशी म्हणून कमालपूर येथील चक्रधर स्वामी मंदीराची राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशात ओळख आहे. आज आषाढी एकादशीचे दिवशी सकाळपासून राज्यातील विविध जिल्ह्यांतून येणारे चक्रधर स्वामी मंदिरातील राजमठ मुख्य दर्शनासह पूर्वेस असणाऱ्या छिन्नस्थळी मंदीरात दर्शनासाठी सायंकाळपर्यंत हजारो भाविकांनी गर्दी केली होती. गोदावरी पात्रात व काठावर असलेली मंदिरे पाण्यात बुडाल्याने भाविकांनी काठावरून दर्शन घेतले. असंख्य भाविकांनी सहकुटुंब गोदावरीचा महापूर पाहून फोटो शुट करण्याचा आनंद घेतला. चक्रधर स्वामी मंदिर विश्वस्त मंडळाचे वतीने भाविक भक्तांसाठी पिण्याचे पाणी, पार्किंग व्यवस्था करण्यात आली होती.



### देडगाव जि प प्राथमिक शाळेची बालदिंडी उत्साहात

**बालाजी देडगाव :** आषाढी एकादशीचे औचित्य साधून नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेच्या वतीने बाल दिंडीचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा परिधान करून टाळ-मृदंगाच्या गजरात, विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषात आणि अभंग-भजनांच्या सुरावटीत गावातून दिंडी काढली. दिंडीमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. याप्रसंगी आदर्श शिक्षक भाऊसाहेब सावंत यांनी सपत्नीक दिंडीचे मनोभावे पूजन करत शिक्षकांचा सन्मान केला. बालदिंडीचे पुष्पवृष्टी करून आणि विद्यार्थ्यांचे स्वागत करत दिंडीचे भव्य स्वागत केले. विद्यार्थ्यांना वारकरी परंपरेचे महत्त्व, संस्कार, शिस्त आणि सामाजिक ऐक्य याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना खाऊ वाटपाचे आयोजन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक संभाजी कडू यांच्यासह सर्व शिक्षक यांनी सहकार्य केले.

### स्वाती अडाणे निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या जिल्हा समन्वयक पदी

**श्रीरामपूर :** जिल्हा परिषद शाळा विठे ता. अकोले येथील केंद्रप्रमुख स्वाती मुकुंदराव अडाणे यांची निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या जिल्हा समन्वयक पदी त्यांची निवड करण्यात आली आहे. निसर्ग व पर्यावरण बाबत जनजागृती, वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन आदी कामाची दखल घेऊन त्यांची निसर्ग व सामाजिक पर्यावरण मंडळाच्या जिल्हा समन्वय पदी निवड करण्यात आली आहे. नुकतेच त्यांना त्याबाबतचे निवड पत्र प्राप्त झाले आहे. त्यांच्या निवडीबद्दल निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे राज्य अध्यक्ष प्रमोद दादा मोरे, राज्य उपाध्यक्ष प्रा. डॉ. लोखंडे सर, प्रकाश केदारी, कार्याध्यक्ष छायाताई राजपूत, अहिल्यानगर जिल्हा संघटक अर्जुन राऊत, जिल्हा कार्यकारिणी सदस्य केरूजी आभाळे आदींनी त्यांचे निवडीबद्दल अभिनंदन केले आहे. व त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच विविध स्तरातून त्यांचे निवडीबद्दल अभिनंदन होत आहे.



### उंबरी बाळापूर येथील आशाबाई वर्पे यांना पीएचडी

**आश्वी :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत येत असलेल्या सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय संशोधन केंद्रातर्फे आशाबाई भाऊसाहेब वर्पे यांना गुरुवारी (दि. २३) विद्या वाचस्पती (पीएचडी) पदवी प्रदान करण्यात आली आहे. वर्पे या उंबरी बाळापूर (ता. संगमनेर) येथील प्रगतशील शेतकरी वेणुनाथ सोन्याबापू सारबंदे यांच्या सुनबाई आणि गणेश वेणुनाथ सारबंदे यांच्या पत्नी आहेत. आशाबाई वर्पे यांनी 'आधुनिक तंत्रज्ञानाचा कृषी उत्पादकतेवर होणाऱ्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास' (विशेष संदर्भ - पश्चिम महाराष्ट्र) या समकालीन आणि शेतीसाठी अत्यंत उपयुक्त असलेल्या विषयावर आपले संशोधन कार्य यशस्वीपणे पूर्ण केले आहे. यासाठी त्यांना डॉ. अजयकुमार पालवे यांच्यासह प्राचार्य डॉ. बाबासाहेब वाघ, डॉ. सुहास आव्हाड, डॉ. प्रमोदिनी कदम, डॉ. शोभा राहणे, डॉ. गणेश वाळुंज यांचे विशेष सहकार्य लाभले.



### निसर्ग पर्यावरण व प्रदूषण निवारण मंडळाच्या राज्य प्रसिद्धी प्रमुख पदी विजय बोडखे

**कोल्हार :** राजुरी येथील पत्रकार व प्रवरा प्रेस क्लबचे अध्यक्ष विजय बोडखे यांची नुकतीच निसर्ग पर्यावरण व प्रदूषण निवारण मंडळाच्या राज्य प्रसिद्धी प्रमुख पदी निवड झाली. तशा आशयाचे पत्र त्यांना निसर्ग पर्यावरण व प्रदूषण निवारण महामंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे यांनी दिले आहे. या निवडीबद्दल त्यांचे राजकीय सामाजिक शैक्षणिक धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले.

# पान १ वरुन

## प्रधानांच्या राजीनाम्यानंतर फडणवीसांना तातडीचे दिल्ली बोलावणे!

तरी केंद्रातील संभाव्य राजकीय बदल, मंत्रिमंडळातील फेरबदल किंवा आगामी राजकीय रणनीतीच्या दृष्टीने ही भेट महत्त्वाची मानली जात आहे. आता दिल्लीतील बैठकीनंतरच या दौऱ्यामागील खरे कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

## एसआरपीएफ जवानाची स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या

असे मृत जवानाचे नाव असून ते मूळचे परभणी जिल्ह्यातील गंगाखेड येथील रहिवासी होते. आषाढी एकादशीच्या दिवशी पहाटे सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या शासकीय महापूजेदरम्यान त्यांनी स्वतःच्या सर्व्हिस रायफलमधून गोळी झाडून टोकाचे पाऊल उचलले. गोळीबाराचा आवाज ऐकताच परिसरातील पोलीस अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी धावले. मात्र, गंभीर जखमी झालेल्या रामेश्वर साबणे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला होता. प्राथमिक माहितीनुसार, त्यांनी हे टोकाचे पाऊल कोणत्या कारणामुळे उचलले, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. पोलीस या घटनेचा सर्व बाजूंनी तपास करत असून, मृत्यूमागील कारणांचा शोध घेतला जात आहे.आषाढी वारीसारख्या अत्यंत महत्त्वाच्या धार्मिक सोहळ्याच्या बंदोबस्तादरम्यान घडलेल्या या घटनेमुळे पोलीस दलात शोककळा पसरली असून, सहकाऱ्यांमध्येही हळहळ व्यक्त केली जात आहे.

# विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या यशाचे संगमनेरमध्ये स्वागत

## केंद्र सरकारविरोधात काँग्रेससह समविचारी पक्षांचा आनंदोत्सव

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर:** दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनाला यश मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर संगमनेरमध्ये काँग्रेससह विविध समविचारी पक्ष आणि विद्यार्थी संघटनांच्या वतीने स्वागत करण्यात आले. संगमनेर बसस्थानक परिसरात आंदोलनाला पाठिंबा दर्शवत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, जंतर-मंतर येथे २८ दिवसांपासून सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाकडे केंद्र सरकारने दुर्लक्ष केले. आंदोलन दडपण्यासाठी विद्यार्थ्यांवर लाठीमार करण्यात आला, ज्यात अनेक युवक-युवती जखमी झाले. शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचारामुळे शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा आवश्यक होता. विद्यार्थ्यांच्या एकजुटीमुळे सरकारला माघार घ्यावी लागली असून, हा तरुणाईच्या संघर्षाचा विजय असल्याचे त्यांनी सांगितले. लोकशाही आणि राज्यघटनेच्या रक्षणासाठी तरुणांनी संघटित राहण्याचे आवाहनही त्यांनी केले. यावेळी दुर्गाताई तांबे यांनीही विद्यार्थ्यांवरील कारवाईचा निषेध व्यक्त करत, आंदोलनकर्ते कोणत्याही पक्षाचे नसून देशाचे भवितव्य असल्याचे सांगितले. सरकारने विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष करून त्यांच्यावर अन्याय केल्याचा आरोप त्यांनी केला. या कार्यक्रमात शिवसेनेचे अमर कतारी, ॲड. रंजना गवांदे, तुषार पानसरे, शेखर सोसे आदींनीही केंद्र सरकारच्या धोरणांवर टीका केली. कार्यक्रमास काँग्रेस, छात्र भारती, शिवसेना, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सत्यशोधक समाज, दलित पँथर, शेतकरी संघटना, एनएसयूआय, महिला संघटना तसेच विविध पुरोगामी आणि विद्यार्थी संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### झेन झी चा जल्लोष

**केंद्र सरकारचे शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा उशिरा झाला मात्र सरकारला तरुणाईने नमवले या आनंदोत्सवात संगमनेर वरील युवकांनी फटाक्यांची आतिषबाजी करत उत्साह साजरा केला याचबरोबर यापुढील काळात लोकशाही व राज्यघटना वाचवण्यासाठी आम्ही एकत्रितपणे लढू असे म्हणून झेन जी जिंदाबाद च्या घोषणा दिल्या.**

# आषाढी एकादशीनिमित्त शिर्डीत भक्तिमय उत्साह

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** आषाढी एकादशीच्या निमित्ताने श्री साईबाबा संस्थानच्या वतीने शिर्डीत स्थानिक उत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. साईबाबा समाधी मंदिर परिसरात दिवसभर भाविकांची मोठी गर्दी उसळली असून, संपूर्ण परिसर विठ्ठलनाम आणि साईनामाच्या जयघोषाने भक्तिमय झाला आहे. या निमित्ताने श्री साईप्रसादालयात भाविकांसाठी साबुदाणा खिचडीच्या विशेष महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. दुपारपर्यंत २३ हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला, तर २८ हजार ९८३ भाविकांना अन्नपाकिटांचे वितरण करण्यात आले. रात्रीपर्यंत सुमारे ४५ हजार भाविक महाप्रसादाचा लाभ घेतील, असा अंदाज संस्थान प्रशासनाने व्यक्त केला आहे. यासाठी ६० पोते साबुदाणा, ४५ पोते शेंगदाणे, ९०० किलो शेंगदाणा तेल, २,५०० किलो बटाटे आणि अन्य साहित्याचा वापर करण्यात आला. आषाढ शुद्ध एकादशीला साईबाबांनी परमभक्त दासगणू महाराजांना भगवान विठ्ठलाच्या रूपात दर्शन दिल्याची परंपरा आहे. त्याच स्मृती जपत आजही हा उत्सव साजरा केला जातो. यानिमित्ताने समाधी मंदिर आणि परिसराची आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आली असून, बाबांच्या समाधी चौथऱ्यावर भगवान श्री विठ्ठलाची प्रतिमा विराजमान करण्यात आली आहे. धूप आरतीच्या वेळी विठ्ठलाची पारंपरिक मराठी आरतीही सादर करण्यात आली.



# आधुनिक दुग्धव्यवसायातून घडवला यशाचा आदर्श

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** जिद्द, आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि शास्त्रोक्त व्यवस्थापन यांच्या बळावर दुग्धव्यवसायातही उल्लेखनीय यश मिळवता येते, हे आश्वी बुद्रुक येथील युवा दूध उत्पादक शेतकरी डॉ. निलेश शिंदे यांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले आहे. उच्च दर्जाचे पशुपालन, संतुलित आहार व्यवस्थापन, स्वच्छ व वैज्ञानिक गोठा पद्धती तसेच जनावरांच्या आरोग्याची नियमित काळजी यामुळे त्यांनी दूध उत्पादनात लक्षणीय वाढ साधत परिसरातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसायाची प्रभावी सांगड घालत डॉ. शिंदे यांनी आर्थिक स्वावलंबनाचा नवा मार्ग खुला केला आहे. आधुनिक तंत्रज्ञान, नियोजनबद्ध व्यवस्थापन आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर दुग्धव्यवसाय अधिक फायदेशीर व शाश्वत बनू शकतो, असा विश्वास त्यांच्या यशस्वी वाटचालीतून निर्माण झाला आहे. लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा कृषी शास्त्र संस्थेअंतर्गत कार्यरत व महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्नित कृषी महाविद्यालयातील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी ग्रामीण कृषी कार्यानुभव (ठअथए) कार्यक्रमांतर्गत डॉ. निलेश शिंदे यांच्या दुग्धव्यवसायाला भेट देऊन त्यांच्या यशस्वी उपक्रमाचा प्रत्यक्ष अभ्यास केला. संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदामंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रेरणेने, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, कृषी शिक्षण संचालक डॉ. उत्तमराव कदम, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल खडके, कार्यक्रम समन्वयक डॉ. रमेश जाधव, कार्यक्रम अधिकारी डॉ. विक्रम अनाप तसेच प्रा. अक्षया वाळुंज यांच्या मार्गदर्शनाखाली कृषीदूत देवेंद्र शिंदे, सोहम शिंदे, ओंकार शिंदे, अनिकेत चोरमले आणि बाळासाहेब जवरे यांनी ही अभ्यासभेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी आधुनिक दुग्धव्यवसायातील व्यवस्थापन, पशुपालनातील अत्याधुनिक तंत्रज्ञान, संतुलित आहार नियोजन, जनावरांच्या आरोग्य व्यवस्थापनाच्या पद्धती तसेच दूध उत्पादन वाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांची सखोल माहिती घेतली. प्रत्यक्ष शेतपातळीवरील या अनुभवामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली असून आधुनिक दुग्धव्यवसायाची व्यावहारिक समज अधिक दृढ झाली.




# निधन वार्ता

## मिराताई रोकडे



**कोपरगाव :** तालुक्यातील चांदेकसारे येथील रहिवासी चांदेकसारे व घारी गावच्या पोलीस पाटील मिराताई गोरक्षनाथ रोकडे (वय ५८) यांचे शनिवारी रात्री हृदयविकाराच्या निधन झाले. पंधरा वर्षापासून त्यांच्याकडे चांदेकसारे पोलीस पाटील पदाचा पदभार होता. कोपरगाव तालुका पोलीस स्टेशन अंतर्गत कुठेही काम असो एक स्त्री म्हणून त्यांनी कुठेच संकोच न ठेवता प्रामाणिक काम केले. रस्ते अपघात असो किंवा फौजदारी गुन्हे असो या त्यांनी वेळोवेळी पोलीस स्टेशनला मदत केली.
त्या कर्मवीर काळे कारखान्याचे माजी संचालक डॉ गोरक्षनाथ रोकडे यांच्या पत्नी तर डॉ. सौरव रोकडे यांच्या मातोश्री होत्या.

## अनिल भिसे



**श्रीरामपुर :** प्रतिनिधी

शहरातील नॉर्दन ब्रँच येथिल अनिल मधुकर भिसे (वय ४९) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक विवाहित मुलगी, एक भाऊ, भावजई, जावई, नातु, पुतणे आसा परिवार आहे.
नॉर्दन ब्रँच येथिल सामाजिक कार्यकर्ते सुनिल भिसे यांचे बंधू होत.

## प्रा. डॉ. मिलिंदकुमार भालचंद्र वैद्य यांचे निधन



**झरेकाठी | प्रतिनिधी**

राहाता तालुक्यातील लोणी खुर्द येथील रहिवासी व अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय, संगमनेर येथील संगणकशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणुन कार्यरत प्रा.डॉ. मिलिंदकुमार भालचंद्र वैद्य (वय ५७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी संगीता मिलिंदकुमार वैद्य, मुलगा डॉ. सुमित मिलिंदकुमार वैद्य, भाऊ डॉ. सुभाषचंद्र भालचंद्र वैद्य (डॉ. वैद्य स्पाईन फिजिओथेरपी हॉस्पिटल, राहुरी) असा परिवार आहे.

# ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने पुरस्कारसाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** येथील सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे ५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त सामाजिक उपक्रम व विविध क्षेत्रातील राज्यस्तरीय पुरस्कार वितरणाचा कार्यक्रमचे आयोजन करण्यात येणार आहे, या कार्यक्रमामध्ये कला, क्रीडा ,साहित्य, सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक, आदर्श सरपंच, उपसरपंच, उत्कृष्ट शासकीय सेवा, वैद्यकीय सेवा, उत्कृष्ट सहकार सेवा, कृषिरत्न, आदर्श पशुपालक, उत्कृष्ट महाविद्यालय, आदर्श प्राचार्य, स्वच्छ व सुंदर शाळा, आदर्श कुटुंब, आदर्श तंटामुक्ती अध्यक्ष, आदर्श ग्रामपंचायत आदी क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती, संस्था यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. तरी आपले प्रस्ताव २० ऑगस्ट २०२६ पर्यंत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अर्जुन बी. राऊत मु. पो. टाकळीभान ता. श्रीरामपूर जि. अहिल्यानगर व्हाट्सअप नंबर ९८८१७०८४४५ / ८३७९८१००१८ यावर पाठवावेत असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# साखर कारखान्यांना भाववाढीचा मर्यादित लाभ : माजी आ. मुरकुटे



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** सध्या बाजारात साखरेच्या दरात वाढ झाल्याने साखर कारखान्यांना मोठा आर्थिक फायदा होत असल्याची चर्चा आहेत. मात्र, ही वस्तुस्थिती नसून साखरेच्या भाववाढीचा कारखान्यांना अत्यंत मर्यादित अल्प लाभ होणार आहेत. त्यामुळे साखरेच्या वाढलेल्या दराचा अनावश्यक गवगवा करणे योग्य ठरणार नाही, असे स्पष्ट मत अशोक सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तथा माजी आमदार भानुदास मुरकुटे यांनी व्यक्त केले आहे.यावेळी मुरकुटे म्हणाले की, केंद्र शासनाचे साखर विक्री धोरण कोटा पद्धतीवर आधारित असून, दर महिन्याला निश्चित केलेल्या कोट्यानुसारच साखरेची विक्री करावी लागते. त्यामुळे कारखान्यांना एकाच वेळी संपूर्ण साखरेची विक्री करता येत नाही. राज्यातील बहुतांश साखर कारखान्यांनी त्यांच्या एकूण उत्पादनापैकी सुमारे ८० टक्के साखरेची विक्री आधीच केली असून, सध्या केवळ २० टक्के साठा शिल्लक आहे. आणि शिल्लक २० टक्के साठ्यापुरताच वाढीव बाजारभावाचा लाभ मिळणार असल्याने, संपूर्ण हंगामातील उत्पादित साखरेचा सरासरी विक्रीदर ३८०० ते ३९०० रुपये प्रति क्विंटलच्या घरातच राहील. ही भाववाढ तात्पुरत्या स्वरूपाची असून,सध्या शिल्लक साठा कमी असल्यामुळे कारखान्यांच्या एकूण आर्थिक स्थितीवर यांचा फारसा मोठा परिणाम होणार नाही. त्यामुळे साखरेच्या दरवाढीबाबत वस्तुस्थिती लक्षात घेऊनच भाष्य करावे, असे आवाहन मुरकुटे यांनी केले आहेत.

# जि प शाळा मुद्देश वाडगाव येथे आषाढी निमित्त बालदिंडी सोहळा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** तालुक्यातील मुद्देश वाडगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने विद्यार्थ्यांच्या सहभागातून भक्तिमय वातावरणात दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. वारकरी संप्रदायाची परंपरा, संतविचार आणि भक्तीभाव विद्यार्थ्यांमध्ये रुजावा, तसेच आपल्या संस्कृतीची ओळख लहान वयातच व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांचा पारंपरिक वेश परिधान करून टाळ, मृदुंग, भगवे झेंडे आणि विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषात गावातून दिंडी काढली. ‘‘ज्ञानोबा-तुकाराम‘‘, ‘‘पांडुरंग हरी‘‘, ‘‘विठ्ठल विठ्ठल‘‘ अशा नामघोषांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. विद्यार्थ्यांनी संतांच्या अभंगांचे सुमधुर गायन करून उपस्थितांचे मन जिंकले. लहान बाल वारकऱ्यांचा उत्साह, शिस्तबद्ध मिरवणूक आणि भक्तिभाव पाहून ग्रामस्थ भारावून गेले. गावात दिंडीचे आयोजन करण्यात आल्याने ग्रामस्थांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक अर्जुन अंभोरे, पदवीधर शिक्षक भगवान हिवाळे, संजय भडके, सहशिक्षक राजाराम कापडी, साईनाथ जानराव, सचिन भांड, रोहीदास साळुंके, ज्योती सोनवणे, माधुरी तोडमल, भारती भोये, तसेच सरपंच योगेश तारु,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भारत शिरसाठ, उपाध्यक्ष सतिश चव्हाण, दत्तात्रय बोरुडे, उपस्थित होते.



# स्कोडा ऑटो इंडियाने स्लाव्हिया मोंटे कार्लोची कलर रेंज वाढवली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक, :** स्कोडा ऑटो इंडियाने आपल्या स्लाव्हिया रेंजचा विस्तार केला असून, स्लाव्हिया मोंटे कार्लोमध्ये दोन नवीन एक्सक्लुझिव्ह कलर पर्याय - शिमला ग्रीन आणि स्टील ग्रे दिले आहेत. हे दोन्ही रंग आकर्षक ड्युअल-टोन फिनिशमध्ये उपलब्ध आहेत. केवळ २०० युनिट्सपुरत्या मर्यादित असलेल्या स्लाव्हिया मोंटे कार्लोच्या या लिमिटेड कलर एडिशन्स, सेडानची डायनॅमिक डिझाईन आणि आकर्षक ड्रायव्हिंग अनुभवाला ब्रँडच्या रॅली मोंटे कार्लो वारशाशी जोडतात. ही नवीन भर गाडीला अधिक दमदार व्हिज्युअल प्रेझेन्स देते आणि जे ग्राहक अधिक वैशिष्ट्यपूर्ण आणि एक्सक्लुझिव्ह मालकीचा अनुभव शोधत आहेत, त्यांच्यासाठी हे डिझाईन करण्यात आले आहे.

या नवीन परिचयावर भाष्य करताना, स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड डायरेक्टर आशिष गुप्ता म्हणाले, स्लाव्हिया मोंटे कार्लोच्या आकर्षक डिझाईन, प्रीमियम अपील, ड्रायव्हिंग डायनॅमिक्स आणि आमच्या मोटरस्पोर्ट वारशाशी असलेल्या भक्कम जोडणीमुळे ग्राहकांनी याला चांगला प्रतिसाद दिला आहे. आम्ही मोंटे कार्लो रेंजचे वेगळेपण आणि आकर्षण आणखी वाढवत आहोत आणि ग्राहकांना अधिक पर्याय आणि एक्सक्लुझिव्हिटी देत आहोत. स्लाव्हिया मोंटे कार्लो स्टाईल, परफॉर्मन्स आणि आधुनिकतेचा परिपूर्ण संगम दर्शवते. ग्राहकांच्या वाढत्या अपेक्षांनुसार, आम्ही आमचा सेडान पोर्टफोलिओ आणखी मजबूत करत राहू.

### लिमिटेड मोंटे कार्लो

**नवीन एक्सक्लुझिव्ह कलर पर्यायांव्यतिरिक्त, स्लाव्हिया मोंटे कार्लो त्याच्या ब्लॅक्ड-आऊट एक्सटेरियर डिझाईन, सिग्नेचर मोंटे कार्लो स्टायलिंग एलिमेंट्स, प्रीमियम ब्लॅक आणि रेड इंटिरियर थीम आणि अनेक फीचर्सने सुसज्ज केबिनमुळे स्वत:चे वेगळेपण कायम राखते. स्लाव्हिया रेंजमधील सर्वात आकर्षक व्हेरियंट शोधणाऱ्या ग्राहकांसाठी नवीन शिमला ग्रीन आणि स्टील ग्रे ड्युअल-टोन फिनिशमुळे पर्यायांची व्याप्ती आणखी वाढते. परफॉर्मन्स, कार्यक्षमता आणि ड्रायव्हिंगचा आनंद यांचा सुरेख संगम देत, स्लाव्हिया मोंटे कार्लो स्कोडा ऑटो इंडियाच्या सिद्ध झालेल्या टीएसआय इंजिन्स आणि ब्रँडच्या रिअल ऑटोमॅटिक्स ट्रान्समिशनसह ऑफर करणे सुरूच आहे.**




# नशिबाची परिक्षा

**रविवार दि.२६ जुलै २०२६**

## मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२० ६७० ५८० | ३-४ | १२० २२८ २०० | जोड ३०-६०-१७-९२-४५ |

## कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १०५ १३८ ६०८ | ६-१ | १२८ २९० २०९ | जोड ६२-९१-४५-०८-४५ |

## मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| ४८० ५७० ६६० | २-९ | १२६ १८० ११७ | जोड २१-०९-३५-६७-९४ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

# शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

## द • ख • ल

### उद्या अमरापूरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर

**हातगाव :** शेवगाव व पाथर्डी या तालुक्याच्या वतीने उद्या सोमवार रोजी सकाळी ९.३० वाजता अमरापूर येथे श्री लॉन्स येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर पार पडणार असलेबाबतची माहिती शेवगावचे तहसीलदार आकाश दहाडदे यांनी दिली आहे. या बाबत ते म्हणाले की, राज्य शासनाच्या महसूल विभागामार्फत सबंध राज्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान सुरू असून त्याचाच एक भाग म्हणून ह्या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून शिबिराचा उद्देशच असा आहे की, या शिबिरामध्ये शेतकऱ्या बरोबरच वेग - वेगळ्या विभागाशी निगडीत असणाऱ्या नागरिकाच्या प्रश्नाची सोडवणूक व्हावी व त्यांच्या समस्या कमी वेळात सुटून त्यांचे हेलपाटे वाचावेत असे सांगून दहाडदे म्हणाले की, आमदार मोनिकाताई राजळे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडणार असून प्रमुख अतिथी म्हणून खासदार निलेश लंके,विधान परिषदेचे आमदार शिवाजीराव गर्जे हे उपस्थितीत राहणार आहेत तर जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया व प्रांताधिकारी प्रसाद मते, पाथर्डीचे तहसीलदार डॉ. उध्दव वाघ हे ही उपस्थीत राहणार आहेत. तरी तालुक्यातील शेतकऱ्यांनी व नागरिकांनी उपस्थित रहावे असेही आवाहन शेवटी दहाडदे यांनी केले आहे.

### महिलेच्या साडे तीन लाखांच्या दागिन्यांची चोरी : स्वस्तिक बसस्थानकावरील घटना

**अहिल्यानगर :** शहरातील स्वस्तिक बसस्थानकावर एसटी बसमध्ये चढताना एका महिलेचे साडे तीन लाख रुपयांचे सोन्याचे दागिने चोरट्याने चोरून नेले. ही घटना दि. २४ जुलै रोजी सायंकाळी घडली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात चोरीच्या गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, वैशाली देविदास कसाळ (रा. शेवगाव, सध्या रा. पुणे) या दि.२४ जुलै रोजी सायंकाळी ६ वा. सुमारास स्वास्तिक बसस्थानकातून एसटी बसमध्ये चढत होत्या. त्यावेळी बसस्थानकावर प्रवाशांची मोठी गर्दी होती. या गर्दीचा गैरफायदा घेत एका चोरट्याने त्यांच्या पर्समध्ये ठेवलेले दागिने चोरून नेले. या दागिन्यांमध्ये २ लाख रुपये किमतीचे १८ ग्रॅम सोन्याचे मिनी गंठण, ४० हजार रुपयांची पीळाची अंगठी, ७० हजार रुपयांचे सोन्याचे इयररिंग, ४० हजार रुपयांची कानातील रिंग व लहान बाळाची १० हजार रुपयांची सोन्याची बाळी असा एकूण ३ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेला आहे. दागिने चोरीला गेल्याचे लक्षात येताच या महिलेने कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता कोतवाली पोलीस ठाण्याचे पो. नि. नितीन देशमुख, पो. उ.नि. गणेश देशमुख यांनी सहकाऱ्यांसह तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. वैशाली कसाळ यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीच्या गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून अधिक तपास पोलीस अंमलदार सूर्यकांत डाके हे करत आहेत. बस स्थानक परिसरातील सीसीटीव्ही फुटेच्या आधारे चोरट्यांचा शोध सुरू आहे.

### रामवाडीत तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**अहिल्यानगर :** शहर परिसरातील रामवाडी येथे एका तरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना दि. २४ जुलै रोजी सायंकाळी घडली. बॉबी सुरेश गायकवाड (वय २७ ,रा. रामवाडी, अहिल्यानगर )असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, बॉबी गायकवाड यांनी राहत्या घरी गळफास घेतला. ही बाब लक्षात येताच त्याच्या भाऊ राम सुरेश गायकवाड यांनी त्याला तातडीने रात्री ८:५५ वा. च्या सुमारास उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. शिंदे यांनी तपासणी करून त्याला उपचारापूर्वीच मयत घोषित केले. या घटनेची माहिती तोफखाना पोलिसांना देण्यात आली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूच्या गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

### धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा हा तरुणाईच्या संघर्षाचा विजय : लांडे

**अहिल्यानगर :** केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याला त्यांनी देशातील तरुणाईच्या संघर्षाचा आणि लोकशाहीप्रेमी जनतेच्या



एकजुटीचा मोठा विजय असल्याचे भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे (भाकप) राज्य सचिव सुभाष लांडे यांनी म्हंटले आहे. नीट पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीतील जंतर-मंतर येथे झालेल्या आंदोलनाच्या यशाबद्दल लांडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. सुभाष लांडे यांनी म्हंटले आहे की, जंतर-मंतर येथे सलग २८ दिवस सुरू असलेल्या आंदोलनात देशभरातील युवकांनी संयम, जिद्द आणि संघर्षशील वृत्तीचे दर्शन घडवले. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सी जे पी ने उभारलेल्या या आंदोलनाला विविध डाव्या पक्षांच्या विद्यार्थी-युवक संघटना, सामाजिक संघटना आणि लोकशाहीप्रेमी नागरिकांनी पाठिंबा दिला. या व्यापक जनसमर्थनामुळे सरकारला अखेर माघार घ्यावी लागल्याचा दावा त्यांनी केला.

### वॉरियर्स प्री प्रायमरी स्कूलमध्ये बालचमुंची दिंडी मराठी संस्कृतीचा अनोखा संस्कार



**अहिल्यानगर :** आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये मराठी संस्कृती, संतपरंपरा आणि सामाजिक मूल्यांविषयी जिव्हाळा निर्माण व्हावा या उद्देशाने वॉरियर्स प्री प्रायमरी स्कूल, कॉटेज कॉर्नर, अहिल्यानगर येथे बालचमुंची आकर्षक दिंडी काढण्यात आली. इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील चिमुकल्यांनी पारंपरिक वेशभूषेत साकारलेली ही दिंडी परिसरातील नागरिकांसाठी विशेष आकर्षण ठरली. यावेळी बोलताना वॉरियर्स फाउंडेशनच्या अध्यक्षा तथा कवयित्री शर्मिला गोसावी म्हणाल्या, इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आपल्या मराठी संस्कृतीची, सण-उत्सवांची आणि वारकरी परंपरेची ओळख व्हावी, तसेच लहानपणापासूनच संस्कारमूल्ये त्यांच्या मनात रुजावीत, या उद्देशाने शाळेत वर्षभर विविध सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात. या उपक्रमांना पालकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या दिंडीच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षिका स्मृती घोडेस्वार, हर्षली गिरी आणि वर्षा गुजर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांच्या न्याय हक्कासाठी खा. लंकेंचा मोर्चा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** विद्यार्थ्यांच्या न्याय हक्कासाठी तसेच २०२६ परीक्षेतील कथित पेपरफुटी आणि शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचाराच्या निषेधार्थ खा. निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या वेळी केंद्र सरकार आणि परीक्षा व्यवस्थेविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. मोर्चानंतर विद्यार्थ्यांच्या वतीने विविध मागण्यांचे सविस्तर निवेदन तहसीलदारांमार्फत शासनाकडे पाठविण्यात आले.

यावेळी खा. निलेश लंके म्हणाले की, भाजप सरकारच्या गलथान कारभारामुळे परीक्षेतील पेपरफुटी, परीक्षा प्रक्रियेतील गैरव्यवहार व शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचारामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ झाला आहे. वर्षानुवर्षे परिश्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे करिअर उद्ध्वस्त





झाले असून पेपरफुटीच्या नैराश्यातून तब्बल २२ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचे दुर्दैवी वास्तव आहे.

विद्यार्थ्यांनी आपल्या न्याय हक्कासाठी दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन केले असता त्यांच्यावर लाठीमार करण्यात आला, अश्रुधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्या, अनेक विद्यार्थी जखमी झाले. मात्र सरकारने विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची तयारी दाखविली नाही, अशी टीका त्यांनी केली.

ते पुढे म्हणाले की, आषाढी एकादशीच्या दिवशी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला. पांडुरंगाच्या कृपेने सरकारला जाग आली आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा लागला. मात्र एवढ्यावर प्रश्न संपत नाहीत. विद्यार्थ्यांवरील अन्याय दूर होईपर्यंत लढा सुरूच राहणार आहे.

खा. लंके यांनी सांगितले की, पेपरफुटीमुळे आत्महत्येला प्रवृत्त करणाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी संसदेत करणार असून विद्यार्थ्यांच्या प्रत्येक प्रश्नासाठी संसदेत आवाज उठविणार आहेत. यावेळी त्यांनी कीर्ती भालेराव आणि अभिजीत शिंदे या विद्यार्थ्यांच्या उदाहरणांचा उल्लेख करत परीक्षा प्रक्रियेतील गंभीर त्रुटी उघड केल्या. कीर्ती भालेराव यांना उत्तरतालिकेनुसार ५८० गुण मिळत असताना ऑनलाइन निकालात केवळ ५० गुण दाखविण्यात आले, तर अभिजीत शिंदे यांना ५०२ गुणांऐवजी १७९ गुण दाखविण्यात आले, असा गंभीर आरोप त्यांनी केला. अशा प्रकारच्या चुका विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळ करणाऱ्या असून सरकारने याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे, असे ते म्हणाले. शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा घेणे म्हणजे सर्व प्रश्न सुटले असे नाही. या व्यवस्थेमुळे उद्याचे बोगस डॉक्टर तयार होतील, तर देशाचे भवितव्य धोक्यात येईल. २०१४ पासून सरकारने धर्म आणि जातीय ध्रुवीकरण करण्यात वेळ घालवला; मात्र विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार केला नाही. देशाचे भविष्य विद्यार्थ्यांवर अवलंबून आहे. त्यामुळे त्यांच्या न्यायासाठी यापुढे अधिक तीव्र लढा उभारला जाईल, असेही खा. लंके यांनी स्पष्ट केले. मोर्चानंतर विद्यार्थिनी कीर्ती भालेराव आणि विद्यार्थी अभिजीत शिंदे यांनी छएएढ परीक्षेतील गुणांबाबत झालेल्या कथित अन्यायाची माहिती देत आपली भूमिका मांडली. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या हस्ते तहसीलदारांना शासनाच्या नावे निवेदन देण्यात आले.

## शिक्षणासोबतच संस्कारक्षम मुल्य रुजविणे महत्त्वाचे : कटारिया

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** आषाढी एकादशीनिमित्त केडगाव येथील जेएसएस गुरुकुलच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बाल वारकऱ्यांच्या दिंडीने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. टाळ-मृदंगाच्या निनादात, ज्ञानोबा-तुकोबा, माऊली... माऊली... अशा अखंड जयघोषात निघालेल्या दिंडीने वारकरी संप्रदायाच्या समृद्ध परंपरेचे जिवंत दर्शन घडवले. वारकरी वेशभूषेतील चिमुकले विद्यार्थी, विठ्ठल-रुक्मिणीच्या वेशात सजलेली मुले-मुली आणि खांद्यावर पालखी घेऊन चालणाऱ्या बाल वारकऱ्यांनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

दिंडीचा प्रारंभ शाहूनगर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात विधिवत पूजन करून करण्यात आला. त्यानंतर टाळ, मृदंग, वीणा आणि हरिनामाच्या गजरात दिंडीने मार्गक्रमण सुरू केले. दिंडी मार्गावर नागरिकांनी ठिकठिकाणी फुलांची उधळण करून आणि विठ्ठलनामाचा जयघोष करत बाल वारकऱ्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरील भक्तिभाव आणि वारकरी परंपरेप्रती असलेली आत्मीयता पाहून परिसरातील भाविकही भारावून गेले. दिंडीदरम्यान विद्यार्थ्यांनी हरिनाम कीर्तन, अभंगगायन आणि संत साहित्यावर आधारित भक्तिगीते सादर केली. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि वारकरी परंपरेतील संतांच्या शिकवणीचा संदेश देत विद्यार्थ्यांनी भक्ती, समता, प्रेम आणि सेवाभावाचा संस्कार समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. बालाजी कॉलनी मार्गे दिंडी स्वामी समर्थ मंदिरात पोहोचली. तेथे शांताबाई भजनी मंडळ, एकनाथ नगर यांच्या वतीने अभंग, गवळणी आणि विठ्ठलनामाचा जागर करण्यात आला. टाळ-मृदंगाच्या साथीने झालेल्या भजन-कीर्तनामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. यावेळी प्राचार्य आनंद कटारिया यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, संतपरंपरा, वारकरी संप्रदायाची परंपरा, सर्वधर्मसमभाव आणि नैतिक मूल्ये रुजावीत, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

## धार्मिक विचार हाच संस्कारांचा पाया : आ. जगताप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त आयुर्वेद कॉलेज येथे आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने श्री विठ्ठल-रुक्मिणीची मनोभावे महापूजा, महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. टाळ-मृदुंगाच्या गजरात, विठ्ठल नामाच्या अखंड गजरात आणि भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यामुळे आयुर्वेद कॉलेज परिसरात अक्षरशः पंढरी अवतरल्याचे चित्र निर्माण झाले. विठुरायाच्या दर्शनासाठी व महाआरतीसाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत भक्तिभावाने सहभाग नोंदविला. आषाढी एकादशीनिमित्त आयुर्वेद कॉलेज येथे आयोजित या धार्मिक सोहळ्यास माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर गणेश भोसले, प्रा. माणिकराव विधाते, संपत बारस्कर, कुमारसिंह वाकळे, अमोल गाडे, नगरसेवक मनोज कोतकर, दगडू मामा पवार, ज्ञानेश्वर रासकर, संभाजी पवार, विशाल पवार, नगरसेवक प्रकाश भागानगरे, अनिल बोरुडे, ॲड. युवराज शिंदे, नगरसेवक निखिल वारे, सनी सूर्यवंशी, महेश लोंढे, जालिंदर कोतकर, अनिल मुरकुटे, डॉ. विजयकुमार भंडारी, ऋग्वेद गंधे, प्रा. अरविंद शिंदे, नगरसेविका शितल ढोणे, अजय ढोणे, सुशांत म्हस्के, अवधूत कुलसौंदर, बाबुशेठ नागरगोजे, महादेव कराळे, महेंद्र कांबळे, संतोष ढाकणे, सागर गुंजाळ, ज्ञानदेव पांडुळे, विजय गव्हाळे, योगेश ढुबे, मनीष फुलडाळे, अभिजित बोरुडे, महेश तवले, गोरख पडोळे, शिवाजी चव्हाण, उद्योजक राजेश भंडारी, दत्ता गाडळकर, सुमित लोंढे यांच्यासह हजारो भाविक उपस्थित होते.

## आझाद समाज पार्टी भीम आर्मीचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** नीट परीक्षा पेपर लीक प्रकरणी दिल्लीतील जंतर-मंतर येथे शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या अमानुष लाठीहल्ला व अश्रूधुराच्या वापराच्या निषेधार्थ आझाद समाज पार्टीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली. या आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

हे आंदोलन पक्षाचे जिल्हाध्यक्ष नाथा आल्हाट यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी तसेच छएएढ पेपर फुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात सापडले असून या घोटाळ्याची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तातडीने राजीनामा द्यावा. २० जुलै रोजी जंतर-मंतरवर शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर दिल्ली पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ला आणि अश्रूधुर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी आंदोलनादरम्यान अनेक विद्यार्थी गंभीर जखमी झाले असून काही जणांना आयसीयूमध्ये दाखल करावे लागले. तसेच विद्यार्थिनींशी गैरवर्तन करण्यात आले.

२५ दिवस आंदोलन चालूनही सरकारने चर्चेचे सौजन्य दाखवले नसल्याने नाथा आल्हाट, चंद्रकांत विधाते, जालिंदर साळवे, भारत मुलाडे, योगेश वाघचौरे, आनंद जाधव, हाऊसराव सूर्यवंशी, नंदू वाकडे, भागा सोनवणे, वैभव जाधव, जितेश कांबळे, वसंत शहाणे, श्रीकांत जाधव, राहुल ठोंबे, दीपक साळवे, गौरव जगधने, प्रवीण खरात, प्रतीक चाबुकस्वार, अजय निंभोरे, सनी सोनकांबळे आदी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

## घरपट्टी पुर्नमूल्यांकनावरून महासभेत अभूतपूर्व गदारोळ

### सर्वेक्षण करणाऱ्या एजन्सीच्या कामकाजाची चौकशी करुन संपूर्ण फेरसर्वेक्षण करावे : भोसले

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** महानगरपालिकेच्या महासभेत घरपट्टी पुनर्मूल्यांकनाचा मुद्दा सर्वाधिक गाजला. खाजगी एजन्सीकडून करण्यात आलेल्या मालमत्ता सर्वेक्षणात मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा आरोप करत सर्वपक्षीय नगरसेवकांनी प्रशासनाला धारेवर धरले. नागरिकांकडून पैसे घेऊन घरपट्टी कमी करण्यात आली, पैसे न देणाऱ्यांवर अवास्तव घरपट्टी लादण्यात आली, अशा गंभीर आरोपांमुळे सभागृहात एकच खळबळ उडाली. संतप्त झालेल्या माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी तक्रारीची फाईल आयुक्त यशवंत डांगे यांच्या दिशेने भिरकावली. त्यानंतर नगरसेवकांनी आयुक्तांविरोधात जोरदार घोषणाबाजी करत सभागृह काही काळ गोंधळात गेले.

यावेळी माजी उपमहापौर गणेश भोसले म्हणाले की, महानगरपालिकेच्या माध्यमातून घरपट्टी पुनर्मूल्यांकनासाठी खाजगी एजन्सीकडून करण्यात आलेले सर्वेक्षण पारदर्शकपणे झालेले नाही. नागरिकांकडून पैसे मागितले जात असल्याच्या हजारो तक्रारी शहरभरातून समोर येत आहेत. पैसे दिल्यास घरपट्टी कमी केली जाते, तर पैसे न दिल्यास अवास्तव घरपट्टी आकारली जाते. पाच हजार रुपयांची घरपट्टी थेट दीड ते दोन लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आल्याची अनेक उदाहरणे आहेत. सर्वसामान्य कुटुंबांनी इतकी प्रचंड घरपट्टी भरायची कशी? अशा परिस्थितीत स्वतःचे घर ठेवण्यापेक्षा भाड्याने राहणे स्वस्त पडेल.

यावेळी आयुक्त यांनी सभागृहाला सांगताना म्हणाले की खूप वर्षानंतर घरपट्टी व पुनर सर्वेक्षणाचे काम सुरू केले आहे यावर नगरसेवक गणेश भोसले संतप्त होत म्हणाले की मग नागरिकांच्या घरावर दरोडा टाकता का नागरिकांवर अन्याय करणाऱ्या सर्वेक्षण एजन्सीच्या कामकाजाची सखोल चौकशी करून संपूर्ण फेरसर्वेक्षण करण्यात यावे. अन्यथा तीव्र स्वरूपाचे लोकआंदोलन उभारले जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

गणेश भोसले यांनी पाच हजार रुपयांच्या घरपट्टीऐवजी थेट दीड लाख रुपयांची आकारणी झाल्याची उदाहरणे सभागृहात मांडली. काही ठिकाणी पैसे घेऊन घरपट्टी कमी केल्याचा गंभीर आरोप करत त्यांनी संपूर्ण फेरसर्वेक्षणाची मागणी केली.

डॉ. सागर बोरुडे यांनी गोठे व पत्र्याच्या खोल्यांनाही घरपट्टी आकारल्याचा मुद्दा उपस्थित करत सर्वसामान्यांवर अन्याय होत असल्याचे सांगितले.

करण कराळे यांनी भाडे उत्पन्नाच्या चुकीच्या निकषांवर आकारणी केल्याचा आरोप केला. शहरातील मोकळ्या भूखंडधारकांकडे सुमारे ३३ कोटी रुपयांची थकबाकी असताना ती वसूल करण्याऐवजी सामान्य नागरिकांवर अन्याय होत असल्याचे त्यांनी सांगितले.

मनोज कोतकर यांनी हरकतींसाठी १५ दिवसांची मुदत दिली असली तरी अनेकांना नोटिसाच मुदत संपल्यानंतर मिळाल्या असल्याने नागरिकांवर अन्याय झाल्याचा मुद्दा उपस्थित केला.

कुमारसिंह वाकळे यांनी, महापालिका ही ईस्ट इंडिया कंपनी नाही, असे स्पष्ट शब्दांत सांगत भाडे उत्पन्नावर ४० टक्के कर आकारणी करू नये, अशी मागणी केली. शीतल ढोणे यांनी इतर महानगरपालिकांमधील घरपट्टी आकारणीचा अभ्यास करून सुधारित व न्याय्य पद्धतीने कर आकारणी करण्याची सूचना केली. संपत बारस्कर यांनी मालमत्ता नावनोंदणीवेळी आकारण्यात येणारे एक टक्का शुल्क रद्द करण्याची मागणी केली.

# केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यानंतर आरपीआयचा जल्लोष

## युवा शक्तीचा विजय, लोकशाहीचा सन्मान; वाडियापार्कमध्ये घोषणा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणाविरोधात दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या युवकांच्या आंदोलनाला यश मिळाल्याचा दावा करत, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्याची माहिती समोर आल्यानंतर अहिल्यानगर शहरात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (गवई) युवकांनी वाडियापार्क येथील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासमोर जल्लोष साजरा केला. लोकशाहीचा विजय असो, संविधानाचा विजय असो, युवा शक्तीचा विजय असो अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. त्यानंतर नीट पेपरफुटी प्रकरणामुळे मानसिक तणाव आणि नैराश्यात जाऊन आत्महत्या केलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. उपस्थित युवकांनी दोन मिनिटे मौन पाळून दिवंगत विद्यार्थ्यांना आदरांजली अर्पण केली.



यानंतर युवकांनी जोरदार घोषणाबाजी करत देशभरातील विद्यार्थ्यांच्या एकजुटीचा आणि संघर्षाचा हा विजय असल्याचे सांगितले. या जल्लोषात सुशांत म्हस्के, गुलामअली शेख, विजय शिरसाठ, अजीम खान, स्वप्निल साठे, जमीर सय्यद, अजय खरात, नईम शेख, अजीज शेख, शाहबाज शेख, शुभम ठोंबे, लकी वाघमारे सहभागी झाले होते. आंदोलनाच्या माध्यमातून देशातील युवकांनी शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकता, न्याय आणि उत्तरदायित्वासाठी एकत्र येत लोकशाही मार्गाने लढा दिला असून, त्याला यश मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

सुशांत म्हस्के म्हणाले की, हा केवळ एका मंत्र्याच्या राजीनाम्याचा विषय नाही, तर लोकशाही आणि भारतीय संविधानाच्या मूल्यांचा विजय आहे. देशातील युवक जागृत झाला असून, तो आता शिक्षण, रोजगार आणि देशहिताच्या प्रश्नांवर जात, धर्म, पंथ आणि प्रांत यापलीकडे जाऊन एकत्र येत आहे. या आंदोलनाने खऱ्या अर्थाने जागरूक भारतीय युवकांचे दर्शन घडवले आहे. ते पुढे म्हणाले की, सरकारने केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा स्वीकारण्यास उशीर केला. आंदोलनादरम्यान दिल्ली पोलिसांनी युवकांवर अमानुषपणे लाठीचार्ज केला, तसेच आंदोलन दडपण्यासाठी महिला आंदोलनकर्त्यांशी गैरवर्तन झाल्याचे गंभीर आरोपही करण्यात आले. मात्र, या सर्व दडपशाहीला न जुमानता युवकांनी शांततामय आणि लोकशाही मार्गाने संघर्ष सुरू ठेवला. त्यामुळे सरकारलाही युवकांच्या ताकदीची आणि जनमताची दखल घ्यावी लागली. यावेळी स्वप्निल शिरसाठ यांनीही आपल्या भावना व्यक्त करत सांगितले की, हा देशातील युवकांच्या संघर्षाचा विजय आहे. शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, यासाठी देशभरातील युवकांनी एकजुटीने लढा दिला. या संघर्षाला अखेर यश मिळाले असून, हा विजय प्रत्येक विद्यार्थ्याचा आणि पालकांचा आहे.

# उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते अजितदादा पवार कृषी समृद्धी कर्ज योजनेचा शुभारंभ

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** बदलत्या हवामानामुळे शेती क्षेत्रासमोर अनेक आव्हान असून आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारणे ही काळाची गरज आहे. ही गरज ओळखून पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत कृत्रीम बुद्धिमत्तेवर आधारित अजितदादा पवार कृषी समृद्धी योजनेचा शुभारंभ केला आहे. कृत्रीम बुद्धिमत्तेवर आधारित शेती ही क्रांतिकारक चळवळ जिल्ह्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने आयोजित अजितदादा पवार कृषी समृद्धी कर्ज योजनेचा शुभारंभ, शेतकरी मेळावा व आदर्श शेतकऱ्यांच्या सन्मान सोहळ्यात त्या बोलत होत्या. यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, म्हाडाच्या पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, आमदार तसेच पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक दिलीप वळसे पाटील, आमदार शंकर मांडेकर, जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, साखर आयुक्त संजय कोलते, बँकेचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे, उपाध्यक्ष सुनील चांदेरे आदी उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, कृत्रीम बुद्धिमत्तेवर आधारित शेतीसाठी ५०० कोटी रुपयांच्या योजनेची घोषणा दिवंगत अजितदादांनी दोन वर्षांपूर्वी अर्थसंकल्पात केली होती. सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण विकासाला पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेने नेहमीच प्राधान्य दिले आहे. कृषी समृद्धी योजनेच्या अंतर्गत १ हजार कोटी रुपयांचे कर्ज वितरणाचे उद्दिष्ट बँकेने ठेवले आहे. ही योजना ऊस शेतीमध्ये एआयचा वापर वाढविण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरणार आहे. यामुळे ऊस उत्पादनामध्ये ४० टक्के वाढ, पाण्याची ३० टक्के बचत व रासायनिक खतांचा वापर कमी होऊन शेतीचे आरोग्य सुधारण्यास मदत होणार आहे. या तंत्रज्ञानाचा बारामतीमध्ये यशस्वी प्रयोग करण्यात आला आहे. त्या पुढे म्हणाल्या, यंदाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये महिला शेतकऱ्यांना अधिकृत महिला शेतकरी म्हणून मान्यता देण्याचा ऐतिहासिक कायदा राज्य सरकारने केला आहे. अजितदादांनी नेहमीच महिला सक्षमीकरण आणि शेतकरी कल्याणाला सर्वोच्च स्थान दिले होते. त्यामुळे त्यांच्या जयंतीचे औचित्य साधून पुण्यशोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील लाभार्थ्यांची प्रतीकात्मक यादी प्रसिद्ध करण्यात आली. या योजनेच्या अंमलबजावणीला मोठी गती मिळाली आहे. या योजनेच्या पुणे जिल्ह्याच्या लाभार्थ्यांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून जिल्ह्यातील ६१ हजार ९०० पात्र शेतकऱ्यांना ५२३ कोटी २२ लाख रुपयांचा कर्जमाफीचा लाभ देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. ही पहिली यादी २ लाख रुपयांपर्यंत थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांची आहे. शासनाने दिलेले आश्वासन प्रत्यक्ष कृतीत उतरवत शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची बांधिलकी सिद्ध केली आहे. कर्जाच्या ओझ्यातून मुक्त झालेले शेतकरी अधिक आत्मविश्वासाने शेती करतील असा या योजनेमागचा उद्देश आहे.बळीराजा हा केवळ अन्नदाता नाही तर देशाच्या अर्थव्यवस्थेचा खरा आधारस्तंभ असतो असे सांगून शेतकरी कल्याणाची तळमळ हा वारसा पुढे नेण्याचे काम जिल्हा मध्यवर्ती बँक करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कृषी मंत्री श्री. भरणे म्हणाले, अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना मदत करण्याची नेहमीच शासनाची भूमिका आहे. याच हेतूने 'पुण्यशोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती' योजनेची घोषणा केली आहे. ५६ लाख शेतकऱ्यांना ४० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त मदत या योजनेत मिळणार आहे. या योजनेमुळे २ हजार कोटी रुपयांची मदत जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळणार आहे. शासनाने नुकतीच शेतकऱ्यांना ४८ हजार कोटी रुपयांची वीजबील माफी दिली आहे. यांत्रिकीकरण, मुख्यमंत्री पाणंद रस्ते, सौरऊर्जा अशा अनेक योजना शासन राबवित आहे, असेही ते म्हणाले.शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीबरोबर कृत्रीम बुद्धीमत्तेचा वापर केला पाहिजे. उत्पादन वाढीसाठी नवनवीन तंत्रज्ञान स्वीकारले पाहिजे. एआय मुळे अनेक माहिती वेळेत व अचूक मिळते. केंद्र व राज्य शासनाच्या योजनांमध्ये शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे असे सांगून यांत्रिकीकरणाची प्रलंबित देयके पुढील महिना- दोन महिन्यात अदा करण्यात येतील, असेही श्री. भरणे यांनी सांगितले. सहकार मंत्री श्री. पाटील म्हणाले, अजित पवार कृषी समृद्धी कर्ज योजना शेतकऱ्यांच्या स्वप्नांना बळ देणारी, शेतीला आधुनिकतेची जोड देणारी आणि सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारी योजना आहे.

## द·ख·ल



## पंढरपुरात भव्य भक्तनिवास आषाढी एकादशीला भूमिपूजन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** श्री क्षेत्र पंढरपूर येथे श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी (आळंदी देवाची) यांच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या भव्य भक्तनिवास इमारतीचा भूमिपूजन सोहळा आषाढ शुद्ध एकादशीच्या पावन मुहूर्तावर भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे होते. यावेळी श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे, विश्वस्त ड.राजेंद्र उमाप, योगी निरंजननाथ, चैतन्य महाराज कबीरबुवा, ड.रोहीणी पवार, पुरुषोत्तम पाटील तसेच अन्य मान्यवर, अधिकारी, वारकरी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.आषाढी वारीनिमित्त तसेच वर्षभर पंढरपूरात दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी आणि माऊली भक्तांना सुरक्षित, सुसज्ज व सुलभ निवासाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे भव्य भक्तनिवास उभारण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे राज्यभरातून येणाऱ्या लाखो भाविकांना मोठा दिलासा मिळणार असून वारकरी सेवेला नवी दिशा मिळेल, अशी भावना विश्वस्त चैतन्य महाराज कबीरबुवा यांनी व्यक्त केली.

## जुन्नरच्या खामुंडीत मोफत जनावर आरोग्य शिबिर संपन्न



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा :** स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद पुणे आणि पंचायत समिती जुन्नर यांच्या पशुसंवर्धन विभागामार्फत गुरुवार २३ जुलै रोजी सकाळी ८ वाजता खामुंडी येथे मोफत जनावर आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. पशु चिकित्सालय पिंपरी पेंढार अंतर्गत येणाऱ्या खामुंडी(ता. जुन्नर )येथील भैरवनाथ दूध उत्पादक संस्थेच्या आवारात हे शिबिर संपन्न झाले असल्याची माहिती चेरमन जितेंद्र रोकडे यांनी दिली. या शिबिरात पशुपालकांसाठी मोफत जंत निर्मूलन, मोफत गोचीड निर्मूलन आणि तज्ज्ञांकडून मार्गदर्शन* या सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. गायी, म्हशी, शेळ्या-मेंढ्या आदी जनावरांची आरोग्य तपासणी करून जनावरांमध्ये होणाऱ्या विविध आजारांबाबत पशुपालकांना मार्गदर्शन देखील करण्यात आहे.या शिबिराचे उटघाट्न डॉ.प्रवीण कथले, पशुवैद्यकीय अधिकारी, पिंपरी पेंढार आणि भैरवनाथ दूध उत्पादक संस्था खामुंडी यांच्या सहकार्याने करण्यात आहे. जिल्हा परिषदेच्या वतीने तालुक्यातील सर्व पशुपालकांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन केल्या नंतर तालुक्यातून अनेक गवळी बांधवांनी त्याला चांगला प्रतिसाद दिला आहे.

## सुनील शिंदे यांची आंबेगाव तालुका अध्यक्षपदी निवड



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**वळती :** महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या आंबेगाव तालुका अध्यक्षपदी सुनील आनंदा शिंदे यांची निवड करण्यात आली. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात पुणे जिल्हाध्यक्ष अशोक नारायण मगर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी बोलताना मगर यांनी इतर मागासवर्गीय समाजातील वंचित घटकांना न्याय मिळण्यासाठी रोहिणी आयोगाच्या शिफारशींची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी केली.

तसेच आदिवासी भागातील ओबीसी विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणासाठी पुढाकार घेऊन शासनाच्या शैक्षणिक योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.सुनील शिंदे यांनी नागापूर गावात उपसरपंच, सरपंच आदी पदांवर काम केले असून त्यांच्या निवडीमुळे तालुक्यातील नाभिक समाजाच्या संघटनात्मक कार्याला बळ मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. कार्यक्रमाची सुरुवात संत सेना महाराज यांच्या प्रतिमापूजनाने झाली. यावेळी अनिता मगर, सोमनाथ शिंदे, संतोष गोरे, रुपाली गोरे, वनिता कारेकर, कविता वाळुंज यांच्यासह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. सूत्रसंचालन तेजस पंडित यांनी, तर आभार प्रदर्शन नितीन शिंदे यांनी केले.

## भोरला गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार
## २४ गावातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

विक्रम शिंदे । राष्ट्र सह्याद्री

**भोर :** डॉ. हेडगेवार स्मृती सेवा समिती भोरच्या वतीने आणि पुणे येथील सेवा सहयोग यांच्या सहकार्याने वनवासी कल्याण आश्रम केंद्र भोर येथे शालांत परीक्षेत उज्ज्वल यश मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ नुकताच पार पडला. इयत्ता १० वी आणि १२ वी बोर्ड परीक्षेत तालुक्यात आणि विविध शाखा आणि विद्यालयातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांचा यात समावेश होता. मुख्याध्यापिका निलिमा मोरे यांचे अध्यक्षतेखाली संम्पन्न कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ.उदयराव जोशी उपस्थित होते.यावेळी विविध शाळांमधील १५ विध्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.संस्थेच्या वतीने बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार दरवर्षी करण्यात येतो. तसेच ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा



तसेच माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येत असल्याचे समितीचे रामकृष्ण पाठणकर यांनी सांगितले. चालू वर्षी तालुक्यातील २४ गावांमधील एकूण ४०० शाळकरी मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.यामध्ये शालेय दप्तरासह शैक्षणिक साहित्याचा समावेश आहे.तर तालुक्यातील वेनुपुरी, कारुंगण, कोंढरी मालुसरे वस्ती वरवंड, हिर्डोशी, धामणदेव, करंजे, अंगसुळे, कारी, कुंड, राजिवडी, शिळीब, निवंगण, कुडली खु., गुढे,धानवली घोलप आवाड,समर्थ रामदास स्वामी माध्य. विद्यालय हिर्डोशी, माध्य. विद्यालय शिरवली हि.मा.,कान्होजी जेधे माध्य. विद्यालय कारी,पसुरे माध्य. विद्यालय पसुरे, घेवडेश्वर माध्य.विद्यालय महुडे,क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके माध्य. विद्यालय रावडी या शाळांमशील विद्यार्थ्यांचा समावेश असून जनजाती कल्याण आश्रम केंद्र भोर आणि सेवा वस्तीमध्ये देखील शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आल्याचे समितीचे सचिव श्रीकांत भातलवंडे यांनी सांगितले. यावेळी रविंद्र पवार, रवी पाटणकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमासाठी नरेंद्र भणगे,उत्तम खंडाळे, विजय शिवतरे, श्रीकांत भातलवंडे, चंद्रकांत पावगे, कृष्णा चव्हाण,शंकर पारठे, छत्रपती शिवाजी महाराजांचे विश्वासू सरदार कान्होजी जेधे यांचे वंशज रणधीर जेधे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## सासवडच्या पुरातन विसावा विठ्ठल मंदिरात भाविकांची गर्दी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :** देवशयनी म्हणजेच आषाढी एकादशी निमित्ताने शनिवारी (दि २५ जुलै) सासवड येथील क-हे काठच्या पुरातन विसावा विठ्ठल मंदिरात भाविकांनी सकाळपासूनच दर्शनासाठी गर्दी केली होती. संत सोपानकाका महाराजांनी संजीवन समाधी घेतेवेळी प्रत्यक्ष श्री पांडुरंग येथे आले होते, त्यावेळी क-हे काठी विश्रांतीसाठी थांबले होते, त्या ठिकाणी मंदिर बांधले व विठ्ठलानी विश्रांती घेतली म्हणून विसावा विठ्ठल असे नाव मंदिरास मिळाले अशी आख्यायिका सांगितली जाते एकादशीनिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी पुरंदरे ट्रस्ट तर्फे पहाटे ६ वाजता महाअभिषेक, महापूजा महाआरती करण्यात आली. प्रवीण खळदकर यांनी पौरोहित्य केले.यतीन पुरंदरे व सौ अर्चना पुरंदरे, किरण पुरंदरे या प्रसंगी उपस्थित होते. सकाळी नऊ ते अकरा या काळात अमोल बेलसरे, प्रशांत चिवटे वीणा बागडे, मल्हार बागडे व पुरंदर कला मंचचे सदस्यांनी भक्ती गीते सादर केली. दुपारच्या सत्रात त्रिवेणी महिला भजनी मंडळाच्या



३५ महिलांनी विठ्ठल पंचपदी सादर केली.सायंकाळी नामदीप महिला भजनी मंडळाचां भजन कार्यक्रम संपन्न झाला तर सायंकाळी उशिराने महाआरती करण्यात आली. मंदिरात भाविकांना रोटरी क्लब, शुभम अनिल जगताप, सोपानकाका बँक यांच्या वतीने गुडदाणी वाटप केल्याची माहिती ट्रस्टचे किरण पुरंदरे व नाना पुरंदरे यांनी दिली. दिवसभरात हजारो भाविकांनी विठ्ठल दर्शनाचा लाभ घेतला.



## वडगांव निंबाळकर पोलीस कारवाई..

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्यातील वडगाव निंबाळकर पोलीसांनी हायवा टिपर चोरणाऱ्या टोळीचा पर्दापाश करून एकूण ८ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करून दोन आरोपी जेलबंद वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन हद्दीत दि २२ व २३ रोजीचे दरम्यान मौजे मुढाळे (ता. बारामती ) येथील माळशिखारे यांचे हिंदुस्थान पेट्रोलींयम कंपनीचे पंप्पावरून चोरी झाल्याबाबत दि. २३ रोजी वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन गु.र.नं १४६/२०२६ बी.एन.एस. क. ३०३(२) प्रमाणे तक्रार दाखल झाली. त्यानंतर माननीय वरिष्ठांच्या आदेशाने सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन मोहीते यांनी तात्काळ पथक नेमुन गुन्हे शोध पथकाचे पोलीस अंमलदार यांना तात्काळ रवाना करण्यात आले. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे वाळुंज एम.आय. डी.सी. संभाजीनगर येथुन टिपर व दोन आरोपी ताब्यात घेवुन आरोपी राहुल विठ्ठल कराळे वय ३१ वर्षे रा. सिरेगाव ता. गंगापुर जि. संभाजीनगर व आरोपी नामे आदित्य रमेश कराळे वय २५ वर्षे रा. सिरेगाव ता. गंगापुर जि. संभाजीनगर यांनी मिळून केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार भागवत पाटील हे करीत आहेत.

## प्रा. यशवंत गोसावी दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनात सहभागी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** महाराष्ट्रातील प्रसिद्ध व्याख्याते प्रा. यशवंत गोसावी यांनी नीट (छएएढ) परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणामुळे निर्माण झालेल्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर मानसिक तणावातून आत्महत्या केलेल्या निष्पाप विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, या मागणीसाठी दिल्ली येथे सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदविला आहे.

नीट परीक्षेतील पेपरफुटीच्या वादानंतर निर्माण झालेल्या मानसिक तणावामुळे नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील उमराळे येथील २१ वर्षीय विद्यार्थी यश गोसावी याने २० जून २०२६ रोजी आत्महत्या केल्याची घटना समोर आली होती. यशसह अशा प्रकारे अन्यायग्रस्त ठरलेल्या सर्व विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, देशातील शिक्षण व्यवस्थेत आवश्यक बदल करण्यात यावेत, स्पर्धा परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक व विश्वासार्ह व्हावी, तसेच विद्यार्थ्यांच्या हितासाठी ठोस उपाययोजना करण्यात याव्यात, या प्रमुख मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनात प्रा. गोसावी २४ जुलैपासून सहभागी झाले आहेत. यावेळी त्यांनी आंदोलनाचे नेतृत्व करणारे 'कॉकरोच जनता पार्टी'चे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपके यांची भेट घेतली. विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांना पाठिंबा देत त्यांनी आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदविला. शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता, विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याची काळजी, तसेच स्पर्धा परीक्षांच्या प्रक्रियेत आवश्यक सुधारणा करण्याची गरज असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.






## आषाढी एकादशी निमित्त जारकरवाडीत भाविकांची गर्दी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**लोणी धामणी :** जारकरवाडी ( ता. आंबेगाव ) येथे आषाढी एकादशीच्या निमित्त आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील भाविकांनी जारकरवाडी येथील खिंडीत वसलेल्या संत ज्ञानेश्वर मंदिरात दर्शनासाठी मोठी गर्दी केली. दिवसभर विठ्ठल विठ्ठल नामघोषाने परिसर भक्तिमय झाला होता. आषाढी एकादशीला पंढरपूर येथे लाखो भाविकांची यात्रा भरत असली, तरी विविध कारणांमुळे अनेकांना पंढरपूरला जाणे शक्य होत नाही. त्यामुळे अशा भाविकांनी आपल्या परिसरातील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर तसेच संत ज्ञानेश्वर मंदिरात दर्शन घेऊन आषाढी एकादशीचा उत्सव भक्तिभावाने साजरा केला. यावेळी मंदिर समिती व स्थानिक ग्रामस्थांच्या वतीने भाविकांसाठी फराळ व चहाची व्यवस्था करण्यात आली होती. या उपक्रमाचे भाविकांनी कौतुक करत आयोजकांचे आभार मानले. जारकरवाडी येथील खिंडीत वसलेले संत ज्ञानेश्वर मंदिर निसर्गरम्य वातावरणामुळे विशेष आकर्षणाचे केंद्र ठरले आहे. हिरवाईने नटलेल्या परिसरामुळे वर्षभर येथे भाविक व पर्यटकांची रेलचेल असते. आषाढी एकादशीच्या निमित्ताने या परिसरात दिवसभर भक्तांची मोठी वर्दळ पाहायला मिळाली.


## ग्रामपंचायत देऊळगाव गाडा, ता. दौंड, जि. पुणे

**B- १ पेपर नोटीस क्रमांक - १ सन २०२६-२७**

ग्रामपंचायत देऊळगाव गाडा, ता. दौंड, जि. पुणे यांचेकडून खालील नमूद केलेल्या कामाची B-१ निविदा दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषदेकडील योग्य त्या गटातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत.

निविदा अर्ज दि. २४/०७/२०२६ ते दि. ३१/०७/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत सकाळी १० ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय, देऊळगाव गाडा येथे उपलब्ध राहतील व स्वीकारण्यात येतील. प्राप्त झालेल्या निविदा नियमांनुसार उघडण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा विक्री करण्याचा कालावधी | निविदा फि | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे देऊळगाव गाडा येथे सिध्दार्थ नगरमध्ये सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे | रु. १० लक्ष | १/०८/२०२६ ते ४/०८/२०२६ | रु. २३६ /- | रु. १०,०००/- |

**अटी व शर्ती**

१ ) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. २) निविदा फी ग्रामपंचायत देऊळगाव गाडा यांच्या PDCC बँक शाखा केडगाव खाते क्र. ०२२००२५००००००००२ येथील खात्यात भरून त्याची पावती किंवा ग्रामपंचायत कार्यालयात रोख भरल्याची पावती निविदेसोबत जोडणे आवश्यक राहील. ३) यापूर्वी केलेल्या कामाचे पूर्णत्वाचे दाखले (Completion Certificate) निविदेसोबत जोडणे आवश्यक राहील. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत देऊळगाव गाडा यांच्या PDCC बँक शाखा केडगाव खाते क्र.०२२००२५००००००००२ येथील खात्यात भरल्याची पावती किंवा ग्रामपंचायतीच्या नावे डिमांड ड्राफ्ट (DD) निविदेसोबत जोडणे आवश्यक राहील. तसे न केल्यास संबंधित निविदा विचारात घेतली जाणार नाही. ५) तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा स्वतंत्र सीलबंद स्वरूपात सादर करावेत. प्रथम तांत्रिक लिफाफा उघडण्यात येईल. तांत्रिक पात्रता पूर्ण झाल्यानंतरच आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. ६) सदर निविदेबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास निविदा रद्द करणे, कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचा अंतिम अधिकार ग्रामपंचायतीकडे राहील.७) इतर सर्व अटी व शर्ती महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जिल्हा परिषद यांच्या प्रचलित नियमांनुसार लागू राहतील.

**दिनांक : २३/०७/२०२६** सही /- ग्रामविकास अधिकारी सही /- प्रशासक

**ग्रामपंचायत देऊळगाव गाडा, ता. दौंड, जि. पुणे**



## PUBLIC NOTICE

**VASTU HOUSING FINANCE CORPORATION LIMITED**

**A Public Ltd. Company Incorporated under the Companies Act, 1956**

**Date of Incorporation:** 04.02.2005; **CIN:** U65922MH2005PLC272501, **Registered & Corporate Office:** Unit Nos.203 & 204, 2nd Floor, A wing, Navbharat Estates, Zakaria Bunder Road, Sewri (West), Mumbai - 400015
**Tel No:** 022-24190911; **Email:** cs@vastuhfc.com
**Website: https://www.vastuhfc.com;**

**SHIFTING OF BRANCH OFFICE**

The Branch office of Vastu Housing Finance Corporation Limited ("Company") at Pune shall be shifted to the new premises as mentioned below from 17th November,2026 (effective date):

| Old Address (Pune) | New Address (Hinjewadi) |
|---|---|
| Land Bearing CTS No. 363/3, Final Plot No. 715/3, Apartment No. 3, Second Floor, A wing, Pratisad, Jog Condominium, Shivaji Nagar Village, Bhamburda, Haveli, Pune- 411004, Maharashtra | Office No. 603 C and 604 D, Building Vantage 21, Sr No. 133, District Pune, Pimple Saudagar, Haveli, Hinjewadi- 411027, Maharashtra, |

The Old Premises will remain operational till 16th November 2026 From 17th November 2026, onwards, all transactions/customer service requests of the Company should be sent to the new address only.

In case of any queries, you may contact us at: **customercare@vastuhfc.com**

**Address:** Unit Nos. 203 & 204, 2nd Floor,A wing, Navbharat Estates, Zakaria Bunder Road,Sewri (West), Mumbai – 400015



## PUBLIC NOTICE

**VASTU FINSERVE INDIA PRIVATE LIMITED**

**A Private Limited Company Incorporated under the Companies Act, 2013**

**Date of Incorporation:** 28.09.2018; **CIN:** U65990MH2018PTC314935, **Registered & Corporate Office:** Unit Nos. 203 & 204, 2nd Floor, A wing, Navbharat Estates, Zakaria Bunder Road, Sewri (West), Mumbai - 400015
**Toll Free No.:** 1800 22 0001; **Email:** Secretarial@vastufinserve.com
**Website: https://www.vastufinserve.com**

**SHIFTING OF BRANCH OFFICE**

The Branch office of Vastu Finserve India Private Limited ("Company") at Pune shall be shifted to the new premises as mentioned below from 17th November, 2026 (effective date):

| Old Address (Pune) | New Address (Hinjewadi) |
|---|---|
| Land Bearing CTS No. 363/3, Final Plot No. 715/3, Apartment No. 3, Second Floor, A wing, Pratisad, Jog Condominium, Shivaji Nagar Village, Bhamburda, Haveli, Pune-411004, Maharashtra | Office No. 603 C and 604 D, Building Vantage 21, Sr No. 133, District Pune, Pimple Saudagar, Haveli, Hinjewadi-411027, Maharashtra, |

The Old Premises will remain operational till 16th November 2026 From 17th November, 2026 onwards, all transactions/customer service requests of the Company should be sent to the new address only.

In case of any queries, you may contact us at: **customercare@vastufinserve.com**

**Address:** Unit Nos. 203 & 204, 2nd Floor,A wing, Navbharat Estates, Zakaria Bunder Road,Sewri (West), Mumbai – 400015

# संरक्षक कठडा नसल्याने प्रवाशांच्या जीवाशी खेळ

## अपघाताची वाट पाहतेय प्रशासन?

## बेलवंडी-पिंपळगाव पिसा रस्त्यालगत उघडी विहीर

सर्जेराव साळवे । राष्ट्र सह्याद्री

**बेलवंडी :** श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी ते पिंपळगाव पिसा या महत्त्वाच्या सिमेंट काँक्रीट रस्त्यालगत असलेली उघडी व अतिशय धोकादायक विहीर सध्या प्रवाशांच्या जीवावर बेतण्याची शक्यता निर्माण झाली आहे. रस्त्याच्या अगदी कडेला असलेल्या या विहिरीभोवती कोणताही संरक्षक कठडा, लोखंडी रेलिंग किंवा इशारा फलक नसल्याने मोठा अपघात होण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

विशेष म्हणजे, या मार्गावर दररोज शेकडो दुचाकीस्वार, चारचाकी वाहने, शेतकरी, ऊस वाहतूक करणारे ट्रॅक्टर तसेच विद्यार्थी प्रवास करतात. रात्रीच्या वेळी किंवा पावसाळ्यात रस्त्याच्या कडेला असलेली ही विहीर सहज लक्षात येत नाही. वाहनाचा थोडाही तोल गेला किंवा चालकाचे नियंत्रण सुटले तर वाहन थेट विहिरीत कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही.



अपघात झाल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी, दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने तात्काळ पावले उचलावीत, अशी एकमुखी मागणी परिसरातून होत आहे.अन्यथा एखादा निष्पाप नागरिक बळी गेल्यानंतर त्याची जबाबदारी नेमकी कोण घेणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा संबंधित विभागाचे लक्ष या धोक्याकडे वेधले असल्याचे सांगितले जाते. मात्र अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. कोट्यावधी रुपये खर्च करून रस्ते उभारले जात असताना अशा जीवघेण्या ठिकाणी साधे लोखंडी रेलिंग किंवा सुरक्षा भिंत उभारण्याकडे दुर्लक्ष होत असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

प्रवाशांच्या सुरक्षासाठी, सदर धोकादायक विहिरीची पाहणी करून लवकर त्याभोवती संरक्षक लोखंडी रेलिंग करण्यात येईल.

**– महेश खंडागळे (अभियंता)**

नागरिकांनी तातडीने या विहिरीभोवती मजबूत संरक्षण कठडा उभारण्याची, परावर्तित फलक लावण्याची आणि रात्री दिसतील अशी सुरक्षा व्यवस्था करण्याची मागणी केली आहे.

# विठ्ठलाच्या रांगोळीने भाविक मंत्रमुग्ध!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**राशीन :** महाराष्ट्रातील प्रसिद्ध श्री जगदंबा देवी मंदिर, राशीन येथे आषाढी एकादशी निमित्त भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. मंदिराच्या सभामंडपात विठ्ठलाची अत्यंत आकर्षक व देखणी रांगोळी साकारण्यात आली. या रांगोळीने उपस्थित विठ्ठल भक्तांनी भाविकांनी लक्ष वेधून घेतले आणि सर्वांनी रांगोळी साकारलेल्या कलाकाराचे कौतुक केले.

यावेळी श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमेची विधिवत पूजा करून हार-फुले अर्पण करण्यात आली. भजन, नामस्मरण आणि विठ्ठल... विठ्ठल... जय हरी विठ्ठल! या गजराने मंदिर परिसर दुमदुमून गेला. आषाढी एकादशीचे औचित्य साधत भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने दर्शन घेतले व विठ्ठलाच्या चरणी प्रार्थना अर्पण केली.



मंदिरात सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी होती. भक्तिमय वातावरण, फुलांची सजावट आणि विठ्ठलाच्या रांगोळीमुळे श्री जगदंबा मंदिर परिसर आध्यात्मिक उत्साहाने भारावून गेला. आषाढी एकादशीचा हा सोहळा श्रद्धा, भक्ती आणि वारकरी परंपरेचा सुंदर संगम ठरला.

# द·ख·ल

## शिरसगाव विद्यालयात भक्तिमय दिंडी सोहळा



**दहिगाव ने :** लोकनेते मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था संचलित वकीलराव लंघे पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिरसगाव येथे आषाढी एकादशीनिमित्त भक्तिमय वातावरणात दिंडी सोहळ्याचे उत्साहात आयोजन करण्यात आले. या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत परिसर विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून टाकला. प्राचार्य बाबासाहेब धनवटे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती नूतन फासे, जया अंधारे व श्रीमती अनुराधा कदम यांनी दिंडीचे नियोजन केले. यावेळी कु. ज्ञानेश्वरी लोहकरे हिने विठ्ठलाची, तर कु. अनुष्का मिसाळ हिने रुक्मिणीची वेशभूषा साकारून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी आ. विठ्ठलराव लंघे यांनी दिंडीला सदिच्छा भेट देऊन विद्यार्थी, शिक्षक व विद्यालयाच्या या उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांमध्ये धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक मूल्यांची जपणूक करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. दिंडी सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी बाबासाहेब काळे, दत्तात्रय जरे, महेश देशमुख, श्रीहरि वीर, महेश गाढे, सागर वाघमारे, सचिन मोरे, असीम शेख, दीपक पठाडे व जयसिंग खंडागळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## रस्त्याच्या खाली मेंढ्याचा कळप उतरल्याचा रागातुन मेंढपाळास मारहाण

**कर्जत :** रस्त्यावर टँकर उभा असल्याने मेंढ्याचा कळप रस्त्यावरून खाली जात लगतच्या शेतात घुसल्याने त्याचा राग संबंधित शेतकऱ्यास आला. त्याने मेंढपाळ यास काठी, दगड तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात आठ ते दहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास कर्जतचे पोलीस निरीक्षक हणमंत गायकवाड करीत आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवार, दि २३ रोजी कोरेगाव फाटा-सटवाईवाडी (ता. कर्जत) शिवारात दुपारी साडेबाराच्या सुमारास रामदास मल्हारी टेगले (मुढाळे ता.बारामती) हा मेंढपाळ आपल्या मेंढ्याच्या कळपासह बीडवरून बारामतीच्या दिशेने निघाला होता. यावेळी सटवाईवाडी फाटा या रस्त्यावर एक टँकर उभा असल्याने मेंढ्याचा कळप रस्त्याच्या खाली उतरत शेताच्या दिशेने उतरला. मेंढ्या रोडच्या खाली का घेतल्या याचा राग धरत अमोल खराडे, राजेंद्र खराडे, गणेश राजेंद्र खराडे यासह चार महिला आणि त्यांच्या सोबत इतर काही जण यांनी मेंढपाळ रामदास टेगले आणि एक साक्षीदार यास संगनमत करून काठी, दगडाने तसेच लाथाबुक्क्याने मारीत दुखापत केली. तसेच अमोल खराडे याने हातातील घड्याळ व चांदीची अंगठी काढून घेतली असल्याची फिर्याद रामदास मल्हारी टेगले यांनी कर्जत पोलीस ठाण्यात दिली. घटनास्थळी पोलीस उपनिरीक्षक अजिनाथ बटुळे यांनी भेट दिली. सदर घटनेचा पुढील अधिक तपास कर्जतचे पोलीस निरीक्षक हणमंत गायकवाड हे करीत आहे.

## शेवगावच्या श्री रेणुका माता मल्टीस्टेटचे स्वतःच्या वातानुकूलित वास्तूत स्थलांतर

**शेवगाव :** आर्थिक क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या श्री रेणुका माता मल्टीस्टेट को ऑपरेटिव्ह अर्बन क्रेडिट सोसायटी या संस्थेच्या शेवगाव शाखेचे सोमवारी येथील पंचायत समिती रस्त्यावर स्वमालकीच्या वातानुकलित अत्याधुनिक सर्व सुविधांनी युक्त भव्य आणि प्रशस्त अशा पाच मजली वास्तुमध्ये स्थलांतर होत आहे. डॉ. प्रशांत भालेराव यांनी अत्यंत दूरदर्शीपणे २२ वर्षापूर्वी २७ जुलै २००४ ला शेवगाव येथील पहिल्या शाखेची स्थापना केली. या शाखेत २० हजारावर खातेदार लॉकरसह विविध सुविधांचा लाभ घेत असून संस्थेने केलेल्या अर्थसहाय्याने हजारो नागरिकांचे व्यवसाय उभे राहिले आहेत, नावारूपाला आले आहेत. डॉ. भालेराव यांच्या. पारदर्शी व खातेदार हितदक्ष कार्य पद्धतीमुळे संस्थेची ' दिन दुनी रात चौगुनी ' प्रगती झाली आहे. या संस्थेचा वटवृक्ष झाला असून देशातील ९ राज्यात तब्बल १४१ शाखा द्वारे १२ लाखावर खातेदार सदस्यांनी संस्थेत आपली आर्थिक पुंजी सुरक्षित केली आहे.

## कर्जतला अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय सुरू करावे : शेवाळे

**राशीन :** कर्जत व जामखेड तालुक्यातील नागरिकांना न्यायदानाची प्रक्रिया अधिक सुलभतेने उपलब्ध व्हावी या उद्देशाने कर्जत येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय सुरू करण्याबाबत आज कर्जत तालुका वकील संघाचे ॲड. कैलास शेवाळे, ॲड. दत्तात्रय चव्हाण, ॲड. अविनाश मते, ॲड. सचिन रेणुकर. ॲड. संदीप पाटील यांचे शिष्टमंडळाने मुंबई येथील ज्ञानेश्वरी निवासस्थानी ना. राम शिंदे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. शिष्टमंडळाने मांडलेल्या मागणीची सकारात्मक दखल घेत, कर्जत येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयास मंजुरी मिळावी यासाठी मा. मुख्यमंत्रीकडे पाठपुरावा करून शासनस्तरावरील आवश्यक कार्यवाही पूर्ण करत मंत्रिमंडळाच्या मान्यतेसह सदर न्यायालयास तातडीने मंजुरी मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन विधान परिषदेचे सभापती माननीय ना. राम शिंदे यावेळी दिले.

# अनुसूचित जाती-जमातीच्या शेतकऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या योजनांचा लाभ घ्यावा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत राज्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना आपल्या मालकी हक्काच्या शेतजमिनीमध्ये विहीर खोदण्यासह इतरही असंख्य योजना अनुदान तत्त्वावर देण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेण्यात आला असून अहिल्यानगर जिल्हा परिषदेमार्फत या योजनेस प्रारंभ झाला असून जिल्ह्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांनी आपले ऑनलाइन अर्ज भरून सदर योजनेचा जास्तीत - जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन शेवगाव पंचायत समितीचे कृषी अधिकारी ज्ञानदेव गुरगुडे यांनी दिली आहे.या बाबत अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले आहे की,राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वालंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेअंतर्गत (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) नवीन सिंचन विहिरसाठी ४ लाख ,जुनी विहीर दुरुस्ती १ लाख, शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण २ लाख, इनवेल बोअरिंग ४० हजार,वीज जोडणी आकार २० हजार, पंपसंच (डिझेल/विद्युत) ४० हजार, सोलर पंप, ५० हजार, एचडीपीई/पीव्हीसी पाईप ५० हजार ,तुषार सिंचन संच, ४७ हजार, ठिबक सिंचन संच ( पूरक अनुदान ) ९७ हजार, यंत्र सामुग्री (बैल चलित/ट्रॅक्टर चलित अवजारे) नवीन बाब ५० हजार, परसबाग ५ हजार या सर्व योजनेसाठी दोन्ही प्रवर्गातील शेतकरी पात्र ठरणार असून विंधन विहीर या बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेसाठी ५० हजार एवढी रक्कम अनुदान स्वरूपात मिळणार असून सुधीर शिंदे, सोनाली हजारे, सोनल शहा यांचे मार्गदर्शखाली तालुक्यातील यांचे समवेत मेळावे घेऊन दोन्ही प्रवर्गातील शेतकऱ्याना माहिती दिली जात असून त्यासाठी जे निकष दिलेले आहेत पुढीलप्रमाणे आहेत.

# घोरपडीची शिकार : चौघे ताब्यात



### जखमी घोरपडींची पशुवैद्यकीय तपासणी

शिकाऱ्याकडून हस्तगत करण्यात आलेल्या घोरपडी जखमी अवस्थेत असल्यामुळे त्यांची पशुवैद्यकीय तपासणी करण्यात आली. घोरपडींच्या शरीरावर विविध प्रकारच्या जखमा आढळून आल्या असून त्यांना पुढील विशेष उपचार व पुनर्वसनाची आवश्यकता असल्याचे पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. अभयारण्य क्षेत्रात बेकायदेशीर प्रवेश करणे, वन्यजीवांची शिकार करणे किंवा वन्यजीवांना कोणत्याही प्रकारे इजा पोहोचविणे हा गंभीर व शिक्षापात्र गुन्हा आहे. अशा प्रकारच्या घटना अथवा संशयास्पद हालचाल करताना निदर्शनास आल्यास नागरिकांनी तात्काळ कर्जत वनविभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी संकेत उगले यांनी केले.

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** थेटेवाडी-मिरजगाव वनविभागाच्या हद्दीत बेकायदेशीर घोरपड या वन्यप्राण्याची शिकार करताना तीन प्रौढ व्यक्ती आणि एक विधी संघर्षित बालकास वनविभागाने जेरबंद केले. त्यांच्याकडून तीन जीवंत जखमी अवस्थेतील घोरपडीं हस्तगत करण्यात आल्या आहेत. या आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांना २७ जुलैपर्यंत वनकोठडी ठोठावण्यात आली आहे. अशी माहिती मिरजगाव वनपरिक्षेत्र अधिकारी संकेत उगले यांनी दिली.

माळढोकपक्षी अभयारण्यातर्गत वनपरिक्षेत्र मिरजगाव हद्दीतील मौजे थेटेवाडीच्या गटक्रमांक ८३ व ८४ शिवारात गुरुवारी दुपारी वनसंरक्षक आदेश गायकवाड गस्तीवर असताना त्यांना चार इसम दोन कुत्र्यांच्या सहाय्याने अभयारण्यात बेकायदेशीररीत्या प्रवेश करून घोरपड या संरक्षित वन्यप्राण्यांच्या शोध घेत असल्याचे निदर्शनास आले. चार ही इसम अभयारण्य परिसरातील दगड व गोटे बाजूला करून घोरपड शोधत ती घोरपड बाहेर पडताच कुत्र्यांच्या सहाय्याने त्यांना पकडून बारदानाच्या पिशवीमध्ये ठेवताना आढळले. सदरची माहिती मिरजगाव वनपरिक्षेत्र कार्यालयास देत तात्काळ घटनास्थळी येण्याच्या सूचना केल्या. शिकार प्रतिबंधक पथकाने घोरपडीची बेकायदेशीर शिकार करताना अजय बबन जाधव, संदिप अशोक जाधव, सुरज अशोक जाधव आणि एक विधी संघर्षित बालकास (सर्व रा. खडकत ता.आष्टी-बीड) घटनास्थळी रंगेहात पकडले. त्यांच्याकडून तीन जिवंत जखमी घोरपडी तसेच शिकारीसाठी वापरत असलेले दोन कुत्रे ताब्यात घेतले.

# विमा भरण्यास शेतकऱ्यांनी फिरवली पाठ

## अनियमित पाऊस, भरपाईबाबतचा अविश्वास आणि आर्थिक अडचणींचा परिणाम

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**कोरडगाव :** यंदाच्या खरीप हंगामात पीक विमा योजनेसाठी अर्ज करण्यास अनेक शेतकऱ्यांनी पाठ फिरवल्याचे चित्र दिसून येत आहे. गेल्या काही वर्षांत वेळेवर नुकसानभरपाई न मिळणे, भरपाईची रक्कम अत्यल्प मिळणे तसेच अर्ज प्रक्रियेतील अडचणी यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढली असून यंदा अनेकांनी पीक विमा भरणे टाळले आहे.

परतीचा पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ किंवा इतर नैसर्गिक संकटांमुळे पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असतानाही अनेक शेतकरी विम्यापासून दूर राहत आहेत. विमा भरूनही अपेक्षित लाभ मिळत नाही, अशी भावना शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. त्यातच वाढलेला शेती खर्च, बियाणे, खते आणि औषधांच्या वाढत्या किमतीमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना विमा हप्ताही अतिरिक्त भार वाटत आहे. शेतकरी संघटनांनी शासनाने पीक विमा योजनेत अधिक पारदर्शकता आणावी, नुकसानभरपाईचे निकष स्पष्ट करावेत आणि पात्र शेतकऱ्यांना वेळेत भरपाई मिळावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा पुढील काळात पीक विमा योजनेपासून शेतकरी अधिकाधिक दूर जातील, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

यंदा विमा अर्जांची संख्या घटल्याने कृषी विभागासमोरही जनजागृतीचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. पीक विम्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी गावपातळीवर विशेष जनजागृती मोहीम राबविण्याची गरज व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांचा विश्वास पुन्हा संपादन केल्याशिवाय पीक विमा योजनेला अपेक्षित प्रतिसाद मिळणे कठीण असल्याचे जाणकारांचे मत आहे.

## प्रा. दिवाण यांची राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरणावर निवड

**श्रीगोंदा :** येथील सनराईज समाजकार्य महाविद्यालयाचे प्रभारी संचालक प्रा. चेतन दिवाण यांची महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत महाराष्ट्र राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरण सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



त्यांच्या या प्रतिष्ठित नियुक्तीमुळे श्रीगोंदा तालुक्यासह समाजकार्य आणि मानसिक आरोग्य क्षेत्रासाठी हा अभिमानाचा क्षण मानला जात आहे. प्रा. चेतन दिवाण यांनी समाजकार्य, मानसिक आरोग्य आणि मनोरुग्णांच्या हक्क संरक्षणासाठी सातत्याने उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या शैक्षणिक नेतृत्वाची, संशोधनाची आणि सामाजिक बांधिलकीची दखल घेत महाराष्ट्र शासनाने त्यांची या महत्त्वाच्या प्राधिकरणावर नियुक्ती केली आहे. मानसिक आरोग्य सेवा अधिनियम, २०१७ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कार्यरत असलेल्या डचक- कडे राज्यातील मानसिक आरोग्य संस्थांची नोंदणी व मानकीकरण, मानसिक आरोग्य सुविधा तपासणी, रुग्णांच्या हक्कांचे संरक्षण, मानसिक आरोग्य व्यावसायिकांचे क्षमता विकास, धोरणांची अंमलबजावणी, कलंक निर्मूलन करण्याची महत्त्वाची जबाबदारी आहे.



## मुलाच्या स्मरणार्थ अकोलकर कुटुंबाकडून हातगाव शाळेला ६ संगणक भेट

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** शेवगाव तालुक्यात हातगाव येथील येथील सौरभ विष्णू अकोलकर या २७ वर्ष तरुणाचा गतवर्षी तालुक्यातील मित्रमंडळासमवेत तिरुपती बालाजीच्या दर्शनासाठी जाताना झालेल्या भीषण अपघातात मृत्यू झाला असून त्याच्या प्रथम वर्षश्रधानिमित्त अकोलकर कुटुंबीयांनी जिल्हा परिषद शाळेला विद्यार्थ्यासाठी ६ संगणक बक्षीस दिले आहेत अशी माहिती जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक गणेश पुरुषोत्तम यांनी दिली आहे.

गतवर्षी सौरभ हा आपल्या ४ मित्रासोबत तिरुपती बालाजीच्या दर्शनासाठी कारमधून गेला असता त्यांच्या कारला भीषण अपघात झाल्याने कारमधील तिघा जणांचा मृत्यू झाला होता तर एक जण वाचला होता.

सौरभला जाऊन १ वर्ष पूर्ण होत असल्याने त्याचे स्मरणार्थ त्याचे वडील विष्णू माणिकराव अकोलकर व पुणे येथे सी ए म्हणून काम पाहत असलेले बंधू शुभम विष्णू अकोलकर यांनी सौरभच्या स्मरणार्थ हातगाव जिल्हा परिषद शाळेला सहा संगणक विद्यार्थ्यासाठी बक्षीस दिले आहे.असेही मुख्याध्यापक पुरुषोत्तम यांनी दिली असून या वेळी सामाजिक कार्यकर्ते संजय गलांडे, सुकदेव बावणे व शाळेचे शिक्षक बाळासाहेब वाघुंबरे, हरीभाऊ सरदार, देविदास गर्कळ, संजीवन शेलार, अंबादास कांबळे, वर्षा नागरे व दत्ता लेंडाळ उपस्थित होते.

## आषाढी एकादशीनिमित्त श्री क्षेत्र भगवानगडावर भाविकांची मांदियाळी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**खरवंडी कासार :** श्री क्षेत्र भगवान गडावर आषाढी एकादशीनिमित्त भाविकांनी विठ्ठल व संत भगवान बाबांच्या समाधीच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. भगवानगडाचे मठाधिपती न्यायाचार्य डॉ. नामदेव शास्त्री यांच्या आदेशा नुसार गडावरील प्रथानाचार्य, नारायण महाराज शास्त्री यांच्या हस्ते गडावरील विजयी पांडुरंग मूर्तीची व बाबांच्या समाधीची महापूजा झाली.

सुरक्षेच्या कारणास्तव पोलिस बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता. संत भगवान बाबांनी भगवान गडाची स्थापना करताना तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते विजयी पांडुरंगाच्या मूर्तीची स्थापना केली.



येथे फक्त विजयी पांडुरंगाची मूर्ती असून रुक्मिणी मातेच्या फक्त पादुका आहेत. वारकरी संप्रदायामध्ये वर्षातील काही मोजक्या दिवसांना विशेष महत्व आहे. त्यापैकी आषाढी एकादशी म्हणजे साधूसंत आणि भगवान पांडुरंग परमात्मा यांच्या भेटीचा विशेष दिवस मानला जातो.

# ...अखेर साईसेवेला नवा प्रशासक

## गणेश औटी यांच्याकडे धुरा, घोटाळ्याची मालिका : प्रशासनाची हालचाल

### १२,८७२ ठेवीदारांच्या आशा पुन्हा पल्लवित

दै. राष्ट्र सह्याद्री इफेक्ट

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** तालुक्यातील काष्टी येथील साईसेवा बिगरशेती ग्रामीण सहकारी पतसंस्थेतील कथित आर्थिक गैरव्यवहार, ठेवीदारांची आक्रमक भूमिका, सातत्याने समोर येणारे धक्कादायक दावे आणि प्रशासकाविना ठप्प झालेले कामकाज यानंतर अखेर प्रशासनाने हालचाल करत गणेश औटी यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून रखडलेल्या कामांना गती मिळण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे.

साईसेवा प्रकरणात यापूर्वी ५६ कोटी रुपयांच्या ठेवी अडकल्या, १२,८७२ ठेवीदारांचे पैसे रखडले, मल्टिस्टेट आणि पतसंस्थेतील आर्थिक व्यवहारांवर प्रश्नचिन्ह, एकाच ठेवीवर अनेक कर्जे, ठेवीच्या पावत्या तारण असल्याचा दावा असूनही त्या ठेवीदारांकडेच असल्याचे आरोप, विनातारण कर्जवाटप, राजकीय हस्तक्षेप, नातेवाईकांना कर्जे, 'निल' दाखल्यांची चर्चा अशा अनेक गंभीर बाबी समोर आल्या होत्या. या सर्व प्रकरणांचा तपास विविध यंत्रणांकडून सुरू आहे.

दरम्यान, सहकार विभागाच्या आदेशानुसार गंभीर आजार, विद्यार्थ्यांचे शिक्षण, ज्येष्ठ नागरिक आणि लग्नकार्यासाठी ३ कोटी रुपयांच्या अंतरिम मदतीचे वाटप होणे अपेक्षित होते. मात्र, पूर्वीच्या प्रशासकावरील कारवाईनंतर संस्था काही काळ प्रशासकाविना राहिल्याने ही प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाली होती.

आता गणेश औटी यांच्या नियुक्तीनंतर रखडलेले आर्थिक प्रस्ताव, ठेवीदारांच्या अर्जांची छाननी, मदतवाटप, कर्ज प्रकरणांची तपासणी आणि संस्थेचे दैनंदिन कामकाज पुन्हा सुरू होण्याची शक्यता आहे. याचबरोबर, ठेवीदारांची सर्वात मोठी अपेक्षा म्हणजे अडकलेली रक्कम टप्प्याटप्प्याने परत मिळावी आणि कथित गैरव्यवहारातील दोषींवर कठोर कारवाई व्हावी.

दरम्यान, २३ जुलैनंतरच्या न्यायालयीन आणि तपास प्रक्रियेकडेही ठेवीदारांचे लक्ष लागले असून, नव्या प्रशासकांच्या नेतृत्वाखाली संस्थेची आर्थिक स्थिती पारदर्शक करण्याचे मोठे आव्हान उभे आहे. नवा प्रशासक आला; आता ठेवीदारांना न्याय आणि पैसे कधी? हा प्रश्न मात्र अजूनही अनुत्तरितच आहे.

दैनिक राष्ट्र सह्याद्री

## हद्दपारीचा आदेश मोडणाऱ्या चट्या शेखला अटक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिंगणापूर** – नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथील कुख्यात सराईत गुन्हेगार शाहरुख उर्फ 'चाट्या' शेख यास हद्दपारीच्या आदेशाचा भंग केल्याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोरयाचिंचोरे येथून ताब्यात घेतले. शाहरुख उर्फ 'चाट्या' शेख याच्याविरुद्ध मारामारी, दहशत माजविणे, गंभीर स्वरूपाचे गुन्हे अशा विविध प्रकारचे १५ हून अधिक गुन्हे दाखल आहेत. त्याच्या वाढत्या गुन्हेगारी पार्श्वभूमीचा विचार करून उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी त्यास दोन वर्षांसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार करण्याचा आदेश दिला होता.



# जलसमृद्ध महाराष्ट्र आणि बळीराजाच्या सेवेसाठी अधिक बळ द्या

## पंढरपुरात विठुरायाच्या चरणी मंत्री विखेंचे साकडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर / झरेकाठी** : आषाढी वारीच्या पावन सोहळ्यानिमित्त जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पंढरपूर येथे श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेऊन राज्य जलसमृद्ध होण्यासाठी आणि बळीराजाच्या सेवेसाठी अधिक कार्य करण्याचे बळ मिळावे, अशी प्रार्थना विठुरायाच्या चरणी केली. यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटीलही उपस्थित होत्या. परंपरेनुसार यंदाही विखे पाटील परिवाराने पंढरपुरात वारकरी सेवेची परंपरा कायम ठेवत जिल्ह्यातून आलेल्या दिंड्यांतील वारकरी आणि भाविकांसाठी उभारलेल्या मठातील सुविधांची पाहणी केली. भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनीही मठात भेट देऊन वारकरी बांधवांशी संवाद साधत त्यांच्या सोयी-सुविधांची विचारपूस केली.मंत्री विखे पाटील म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी आणि वीजबिल माफीचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. पंढरपुरात कर्जमाफीचे पहिले पत्र देऊन सरकारने दिलेल्या शब्दाची पूर्तता केली असून, अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जमाफीची यादीही लवकरच जाहीर होऊन पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात लाभाची रक्कम जमा होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आषाढी वारीसाठी जलसंपदा विभागाने उजनी धरणातून आवश्यक पाणी उपलब्ध करून दिल्याची माहिती देत, उपलब्ध जलसाठ्याचे योग्य नियोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. वारकरी संप्रदायासाठी सुरू करण्यात आलेला 'चरणसेवा' उपक्रम यंदा अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पंढरपूर आगमनावेळी मंत्री राधाकृष्ण विखे यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, माजी आ. प्रशांत परिचारक यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



## विषारी साप चावल्याने एकाचा उपचारादरम्यान मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : नेवासा तालुक्यातील माका येथील एका ४० वर्षीय व्यक्तीचा विषारी साप चावल्याने उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सोनई पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आबासाहेब किसन बानगुडे (वय ४०, रा. माका, ता. नेवासा) यांना २५ जुलै २०२६ रोजी विषारी साप चावल्याने प्रकृती गंभीर झाली.

त्यानंतर त्यांना उपचारासाठी अहिल्यानगर येथील नोबेल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते.मात्र उपचार सुरू असताना वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दुपारी सुमारे ४.३० वाजता त्यांना मृत घोषित केले. याबाबत नोबेल हॉस्पिटलच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सोनई पोलिसांना माहिती दिल्यानंतर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली. या प्रकरणाचा पुढील तपास सोनई पोलीस ठाण्याचे स.पो.नि अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हे. कॉ. चौधरी करीत आहे.

## १० लाखांच्या मागणीसाठी विवाहितेचा छळ ; नऊ जणांवर गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : माहेरहून चारचाकी गाडी घेण्यासाठी १० लाख रुपये घेऊन यावेत, या कारणासाठी विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याची घटना श्रीरामपूरात घडली आहे. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात पतीसह नऊ जणांविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरती किशोर विधाते (रा. लोणी बुद्रुक, हल्ली रा. इंदिरानगर, श्रीरामपूर) असे पीडित विवाहितेचे नाव आहे. याबाबत मिळालेल्या माहिती अशी आहे की, फेब्रुवारी २०२५ मध्ये आरती यांचा विवाह झाला होता. सुरुवातीचे ६ महिने संसार चांगला चालल्यानंतर, सासरच्या मंडळींनी लग्नात हुंडा दिला नाही आणि मानपान ठेवला नाही असे म्हणून सतत टोमणे मारण्यास सुरुवात केली. पीडितेने लोणी येथे नर्सिंगच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला होता, त्यालाही सासरच्या मंडळींनी कडाडून विरोध केला व त्रास वाढवला. पती दारू पिऊन येऊन सासू-सासऱ्यांच्या सांगण्यावरून मारहाण करत असे. तसेच ''गाडीसाठी १० लाख रुपये आणता येत नसतील, तर मुलीला घेऊन जा,'' अशी अट घालत सासरच्यांनी तिचा अनन्वित छळ केल्याचे फिर्यादीने म्हटले आहेत. या प्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरून श्रीरामपूर शहर पोलिसांनी खालील ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. किशोर दीपक विधाते (पती),दीपक विधाते, मंगल दीपक विधाते,शिवीनी वाकडे, अश्विनी महापूर, ज्ञानेश्वर महापूर, रमेश वाघ, साहेबराव गंगावने,गीता साळुंके यांच्याविरोधात सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करत आहेत.

# नेवासा पोलिसांची मध्यरात्री कारवाई

## शेतात लपवलेला लाखोंचा गांजा हस्तगत, दोघे जेरबंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील वाकडी परिसरात मध्यरात्रीच्या सुमारास पोलिसांनी मोठी कारवाई करत गांजा विक्रीच्या काळ्या धंद्याचा पर्दाफाश केला आहे. बेकायदेशीरपणे गांजा बाळगणाऱ्या व विक्रीच्या तयारीत असलेल्या दोन जणांना नेवासा पोलिसांनी रंगेहाथ पकडले असून, त्यांच्याकडून ४ लाख ७८ हजार ६० रुपयांचा तब्बल ४७.८२८ किलो गांजा जप्त करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार (दि.२४) जुलैच्या रात्री ११:५० ते २५ जुलैच्या मध्यरात्री १:५० च्या सुमारास नेवासा पोलिसांना वाकडी शिवारात गुंगीकारक अंमली पदार्थांची विक्री होत असल्याची गुप्त माहिती नेवासा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी प्रताप दराडे यांना माहिती मिळताच शेवगाव उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांच्या उपस्थितीत नेवासा पोलिसांनी तात्काळ वाकडी येथील महादेव पंडित जवदे याच्या राहत्या घराजवळील



शेतातील पत्र्याच्या शेडवर छापा टाकला.

पोलिसांनी शेडची पाहणी केली असता तेथे पिवळ्या, पांढऱ्या आणि हिरव्या रंगाच्या ३ वेगवेगळ्या गोण्यांमध्ये गांजाचा साठा लपवून ठेवल्याचे उघडकीस आले. यात एकूण ४७.८२८ किलो तब्बल १,८८,६४० रु किमतीचा गांजा मिळून आला.

या कारवाईत पोलिसांनी महादेव पंडित जवदे( वय ३८ ), आणि त्याचा साथीदार शुभम बाबासाहेब काळे (वय २९, दोघे रा. वाकडी, ता. नेवासा) यांना जागीच ताब्यात घेतले. आरोपी स्वतःच्या फायद्यासाठी विनापरवाना बेकायदेशीरपणे गांजाची साठवणूक व विक्री करत असल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी पोलीस अंमलदार शहाजी बाबासाहेब आंधळे यांच्या फिर्यादीवरून नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सदरची कारवाई जी अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरू, पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल पवार,उपनिरीक्षक मनोज अहिरे,विकास पाटील, पोलीस हवालदार शहाजी आंधळे, रवी शेळके , अजय साठे, पोलीस कॉन्स्टेबल अमोल डमाळे, हरी धायतडक, संदीप ढाकणे,सुमित करंजकर,नवनाथ शेकडे, गणेश फाटक, राहुल गायकवाड, नारायण डमाळे, चालक पोलीस हवालदार खंडागळे मेजर, महिला पोलीस कॉन्स्टेबल वर्षा कांबळे व होमगार्ड यांनी केली. पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रताप दराडे हे करत आहेत.

## भंडारदरा परिसरात ढगफुटी सदृश पाऊस

### कळसुबाई शिखराजवळ दरड कोसळल्याने भातशेती उद्ध्वस्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : भंडारदरा पाणलोट क्षेत्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे कळसुबाई शिखराजवळ मोठी दरड कोसळली असून पांजरे परिसरातील ३० ते ४० एकर भातशेती गाडली गेली आहे. ओढ्यांनी मार्ग बदलल्याने गांगडवाडीतील घरांमध्ये गाळयुक्त पाणी शिरले आहे. दरम्यान, भंडारदरा धरण भरण्याच्या मार्गावर असून प्रवरा नदीत १० हजार क्युसेक्सपर्यंत विसर्ग सोडण्यात आला आहे. पांजरे गावाजवळील कळसुबाई शिखराजवळील डोंगराची दरड कोसळण्याचा प्रकार शुक्रवारी सकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडला. या घटनेमुळे डोंगरावरील झाडे उन्मळून थेट ओढ्यातून वाहत पांजरे परिसरात आली. दरडीच्या दगडगोट्यांमुळे ओढ्यांनी मार्ग बदलला, तर अनेक शेतकऱ्यांचे शेतीचे बांध फुटून भातशेती वाहून गेली आहे.

ही घटना महसूल विभागाला कळवल्यानंतर तात्काळ प्रशासन घटनास्थळी दाखल झाले. वन्यजीव विभाग, पोलीस प्रशासन, महसूल विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी या घटनेची पाहणी केली. गेल्या तीन ते चार दिवसांपासून भंडारदरा धरणाच्या पाणलोटात अतिवृष्टी होत असल्याने भंडारदरा धरण भरण्याच्या मार्गावर आहे. भंडारदरा धरणाचा पाणीसाठा शनिवारी सकाळी ६ १०,००१ झाला असून धरणाच्या सांडव्यामधून ९६२८ विसर्ग प्रवरा नदीमध्ये सोडला जात आहे. गेल्या २४ तासांत भंडारदरा येथे १०९ मिमी, पांजरे १८९ मिमी, घाटघर १९५ मिमी, रतनवाडी १५५ मिमी, तर वाकी येथे १२२ मिमी पाऊस झाला. निळवंडे धरणामध्ये भंडारदरा धरणामुळे पाणी विसर्जित होत असल्याने धरण ७८.७४ टक्के भरले असून धरणाचा पाणीसाठा ६५६४ दलघफूट झाला आहे.



## ममदापूरमध्ये भुरट्या चोरांचा सुळसुळाट

### एकाच रात्रीत १० शेतकऱ्यांच्या केबल चोरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**ममदापूर** : राहाता तालुक्यातील ममदापूर येथे भुरट्या चोरांचा पुन्हा एकदा धुमाकूळ घातला असून, एकाच रात्रीत गावातील तब्बल ९ ते १० शेतकऱ्यांच्या शेतातील विद्युत मोटारीच्या केबली चोरी झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहेत. चोरट्यांनी रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत विविध शेतांमधील मोटारींना जोडलेल्या केबल कापून लंपास केल्या. या चोरी झालेल्या शेतकऱ्यांमध्ये संतोष शेजूळ (५० फूट केबल), किशोर शेजूळ (२० फूट), पदमा शेजूळ (६० फूट), कैलास दहितुळे (९० फूट), विश्वनाथ शेजूळ, सूर्यभान रोकडे, प्रविण रोकडे आणि मनेष साळुंके यांचा समावेश आहे.आणखी काही शेतकऱ्यांच्याही शेतातील केबल चोरीला गेल्याची माहिती समोर येत आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीही किशोर शेजूळ यांच्या शेतातील ३ एचपीची विद्युत मोटार अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली होती. त्यानंतर आता पुन्हा त्यांच्या शेतातील केबल चोरीला गेल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. वारंवार होणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे शेतकरी हवालदिल झाले असून शेतीसाठी आवश्यक असलेली सिंचन व्यवस्था विस्कळीत झाली आहेत. ममदापूर परिसरात गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने शेतकऱ्यांना रात्री शेतात पहारा देण्याची वेळ आली आहेत.

## दूध उत्पादकांना वाली कोण? दुधाचे दर वाढताच पशूखाद्याच्या दरवाढीवर कृषी परिषदेचा संताप

**प्रमोद कुंभकर्ण । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार** : दुधाच्या दरात अवघी एक ते दोन रुपयांची वाढ होताच पशूखाद्य उत्पादक कंपन्या पोत्यामागे २०० ते ४०० रुपयांची दरवाढ करून दूध उत्पादक शेतकऱ्यांची आर्थिक लूट करत असल्याचा आरोप पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी परिषदेने केला आहे. पशूखाद्याच्या वाढत्या किमतींवर शासनाने तातडीने नियंत्रण आणावे, अन्यथा राज्यभरातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा परिषदेचे प्रदेशाध्यक्ष गुणवंत आठरे यांनी दिला आहे. परिषदेने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, हवामान बदल, उत्पादन खर्चातील वाढ आणि दुधाच्या कमी दरामुळे अनेक शेतकरी दूध व्यवसायापासून दूर गेले होते. मात्र, आता पुन्हा दूध व्यवसायाकडे वळणाऱ्या शेतकऱ्यांसमोर पशूखाद्याच्या अवाजवी दरवाढीचे नवे संकट उभे राहिले आहे. दुधाचे दर वाढण्याचा फायदा शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याआधीच पशूखाद्य कंपन्या मनमानी पद्धतीने दर वाढवून त्यांचा नफा हिरावून घेत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

पशूखाद्य उत्पादक कंपन्यांच्या



विक्री दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाकडे प्रभावी यंत्रणा नसल्याने कंपन्या मनमानी कारभार करत आहेत. त्यामुळे पशूखाद्य विक्रीसाठी स्वतंत्र नियमावली तयार करून दर नियंत्रणासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी कृषी परिषदेने केली आहे. दूध उत्पादक शेतकरी हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून त्याला न्याय देण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**खाद्य उत्पादक कंपन्यांची मनमानी खपवून घेणार नाही !**

**''दुधाचे दर अवघ्या एक-दोन रुपयांनी वाढताच पशूखाद्य कंपन्या पोत्यामागे २०० ते ४०० रुपयांची वाढ करून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळत आहेत. ही उघड लूट असून शासनाने तातडीने किंमत नियंत्रण लागू करावे. अन्यथा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी परिषद राज्यभरातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन उभारेल.''**

**– सुरेश तरकसे, प्रदेश उपाध्यक्ष,**
**पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी परिषद,**
**महाराष्ट्र राज्य**

## वनविभाग व वाकडी ग्रामस्थांच्या तत्परतेने बिबट्याच्या बछड्यास जीवदान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वाकडी** : शेतात चारा काढण्यासाठी आलेल्या शेतकऱ्याच्या हालचालीने बिबट्या मादीने इतरत्र धाव घेत असताना सोबत असलेल्या बछडा सैरभैर होत विहिरीत पडल्याने त्यास वनविभाग व वाकडी ग्रामस्थांच्या मदतीने जीवदान मिळाले आहेत.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, राहाता तालुक्यातील वाकडी येथील शेतकरी जयप्रकाश शेळके हे जनावरांना चारा काढण्यासाठी शेतात गेले होते, त्यांनी चारा काढण्यासाठी सुरुवात केली असताना अचानक बिबटच्याची डरकाळी व लगत असलेल्या विहिरीत जनावराचा आवाज आल्याने त्यांनी तातडीने सर्वत्र फोन करून ग्रामस्थ बोलाऊन घेतले. यावेळी वनविभागाचे गोरक्षनाथ सुरासे हे देखील घटनास्थळी दाखल झाल्यावर त्यांनी वनरक्षक सविता थोरात यांना त्वरीत फोन केला असता सविता थोरात तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या वनरक्षक सविता थोरात यांनी तातडीने बछडा विहिरीतून बाहेर काढण्यासाठी संबंधित विभागास फोन करून पिंजरा बोलविला, काही वेळात पिंजरा घटनास्थळी आल्यावर वनरक्षक सविता थोरात यांनी प्राणी मित्र, शेतकरी व स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने बछड्यास सुरक्षित बाहेर काढून जीवदान दिले.

**वाकडी येथील एका शेतातील विहिरीत बिबट्याचे बछडा आढळून आला असून, याठिकाणी बिबट्याची मादीचा वावर असण्याची शक्यता आहे. तसेच या मादीबरोबर आणखी बछडे असू शकतात. वनविभाग त्यादृष्टीने देखरेख करून त्या मादीस लवकर जेरबंद करेल, मात्र परिसरातील शेतकरी, ग्रामस्त व विद्यार्थ्यांनी काळजी घ्यावी.**

**सविता थोरात**
**वनरक्षक**

वनरक्षक थोरात यांच्या तत्परतेने बिबट्याच्या बछड्यास जीवदान मिळाले असून त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. यासाठी त्यांना अक्षय बडे,राहुल कानडे, बंडू खेमनर,गोरक्ष सुरासे तसेच प्राणी मित्र अभि रंधे यांचे देखील सहकार्य लाभले.



(छायाचित्र – किरण शिंदे )